# मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी, २० २०
पृष्ठे ६८ किंमत : रु. १५
वर्ष विसावे
अंक पहिला




वाचत राहा...






चिपळूण येथे **संमेलनाध्यक्ष श्री. अनिल मेहता** यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे लेखक प्रकाशक साहित्य संमेलन पार पडले. त्याची क्षणचित्रे.



**परमपूज्य दलाई लामा** यांच्या मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या दोन पुस्तकांचे बांबोळी, गोवा येथे प्रकाशन झाले. यावेळी **दलाई लामा यांच्या सोबत मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक सुनील मेहता.**

# मेहता मराठी
# ग्रंथजगत

◆ जानेवारी २०२० ◆ वर्ष विसावे ◆ अंक पहिला

**संपादक**
सुनील मेहता

**कार्यकारी संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
योजना यादव

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस
**मांडणी-अक्षरजुळणी**
*मेहता पब्लिशिंग हाऊस*


— अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **पुरस्कार** | १० |
| **प्रकाशन** | ११ |
| **श्रद्धांजली** | १२ |
| **किस्सा-ए-पब्लिशिंग** | १३ |
| **पुस्तक परिचय** | |
| चेहऱ्यामागची रेश्मा | १४ |
| धर्मांमधील बंधुत्वाच्या मार्गावर | १८ |
| परमसुखाची पर्वणी | २२ |
| कहाणी पहिल्या अगीनगाडीची | २८ |
| आगे बढो | ३२ |
| भल्या दिलाचा माणूस | ३६ |
| द किल लिस्ट | ४० |
| एचएमएस युलिसिस | ४२ |
| **अभिप्राय** | |
| बेंजामिन फ्रँकलिन | ४६ |
| दिव्यगुणी | ४७ |
| **अध्यक्षीय भाषण** | ४८ |
| (दुसरे लेखक-प्रकाशक संमेलन) | |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

संपादकीय

## वर्ष नव्या जाणिवांचं...वर्ष नव्या संहितांचं...

नवीन वर्ष में नवीन पथ धरो
नवीन वर्ष में नवीन प्रण करो
नवीन वर्ष में नवीन रस भरो
धरो नवीन देश-विश्व धारणा

नव्या वर्षाची नवी पहाट अनुभवताना सरल्या वर्षाचे हिशोब मांडून झाले असतील. नव्या वर्षाच्या नव्या संकल्पांनाही सुरुवात झाली असेल. अशा वेळी हरिवंशराय बच्चन यांच्या या ओळी हमखास आठवतात. घडून गेलेलं मागे टाकत पुढे जाण्याच्या या टप्प्यावर आम्हीही नव्या संकल्पांसह सज्ज आहोत. एकेक पुस्तक म्हणजे एक एक जाणीव. म्हणून पुस्तकांच्या संहिता या निव्वळ संहिता नसून जाणिवांचं भांडार असतं. अशाच नव्या जाणिवांचं भांडार घेऊन आम्ही नव्या वर्षात आपल्या भेटीस येऊ.

मागील वर्ष संपता संपता आमच्यासाठी अनेक विलक्षण अनुभव घेऊन आलं. डिसेंबर महिन्याच्या अखेरीस चिपळूण येथे दुसरं मराठी लेखक-प्रकाशक संमेलन पार पडलं. मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक अनिल मेहता यांनी या संमेलनाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. अध्यक्षपदावरून आपली भूमिका मांडताना अनिल मेहता यांनी एकूणच मराठीतील प्रकाशन व्यवसायाचा सर्वांगीण धांडोळा घेतला. त्यांचं हे विवेचन अनेक नव्या प्रकाशकांना मार्गदर्शक ठरलं. दुसरीकडे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांच्या समृद्ध यादीत परमपूज्य दलाई लामांची पुस्तके दाखल झाली. आम्हाला दलाई लामा यांना प्रत्यक्ष भेटून ती पुस्तके सादर करण्याची संधी मिळाली. दलाई लामांनी आमच्या या प्रयत्नांचं कौतुक करत प्रोत्साहन दिलं. मागील वर्षात मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झालेल्या अनेक पुस्तकांनी मानाचे पुरस्कारही पटकावले.

२०२०ची सुरुवात मेहता पब्लिशिंग हाऊससाठी दमदार झाली आहे. आमच्या लाडक्या लेखिका सुधा मूर्ती यांचं 'कल्पवृक्षाची कन्या' हे पुराणांतील स्त्रियांच्या मिथक कथांचं पुस्तक (अनुवादित), बुकर पारितोषिक विजेत्या लेखिका अरुंधती रॉय यांच्या 'द मिनिस्ट्री ऑफ अटमोस्ट हॅपिनेस'चा मराठी अनुवाद, प्रसिद्ध कन्नड लेखक एस.एल.भैरप्पा यांच्या 'साक्षी' पुस्तकाचा मराठी अनुवाद, अशी विलक्षण पुस्तकं या महिन्यात प्रसिद्ध झाली आहेत. तर दुसरीकडे अमेरिकन क्लासिक्समधील तीन महत्त्वपूर्ण पुस्तकंही या महिन्यात प्रकाशित झाली आहेत. मार्क ट्वेन या लेखकाने अमेरिकी साहित्याला आपल्या अनोख्या लेखनशैलीने नवा आयाम दिला. मार्क ट्वेन यांच्या 'द ॲडव्हेन्चर्स ऑफ हकलबेरी फिन' या कादंबरीला खुद्द अर्नेस्ट हेमिंग्वे यांनी जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यकृतीचा किताब बहाल केला होता. ट्वेन यांच्या 'द ॲडव्हेन्चर्स ऑफ हकलबेरी फिन' आणि 'द ॲडव्हेन्चर्स ऑफ टॉम सॉयर' या दोन्ही पुस्तकांचा अनुवाद आम्ही प्रकाशित केला आहे. शिवाय नेथानिएल हॉथॉर्न लिखित 'द स्कार्लेट लेटर्स' या

पुस्तकाचा श्री.ना.पेंडसे यांनी 'प्रायश्चित्त' या नावाने केलेला अनुवादही वाचकांच्या भेटीस येत आहे. बिभूतीभूषण बॅनर्जी यांचं 'पथेर पांचाली' हे पुस्तक भारतीय साहित्य जगतातलं अजरामर पुस्तक. या अनुवादित पुस्तकाने आमच्या ग्रंथसूचीची शान वाढवली आहे. सर्व पुस्तकांची झलक आमच्या अंकातून तुम्हाला मिळेलच.

या पुस्तकांबरोबरच नव्या वर्षात अनेक नव्या संहिता आपल्या भेटीस येतील. पुस्तकांचं जग दिवसेंदिवस विस्तारत असताना त्याचा अर्क आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील. आपल्या दैनंदिन आयुष्यात वाचनाची गोडी वाढविणारे नवे विषय, नवा आशय आम्ही देत राहू. आणि आपण समृद्ध होत राहू, या आकांक्षेसह पुन्हा एकदा,

**नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !!!**






# मेहता मराठी ग्रंथजगत

## नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

### आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

### डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

***Available on***
play.google.com / store / books
www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

**सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती**

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

## WORDPOWER

## बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**




**www.amazon.in**

**play.google.com**

**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

पुरस्कार

## लोकमंगल साहित्य पुरस्कार




लोकमंगल सार्वजनिक वाचनालयामार्फत देण्यात येणारा सर्वोत्कृष्ट कादंबरीसाठीचा राज्यस्तरीय लोकमंगल साहित्य पुरस्कार शर्मिला फडके लिखित आणि मेहता पब्लिशिंग हाऊसद्वारा प्रकाशित **'फोर सीझन्स'** या पुस्तकाला लाभला.

१४ डिसेंबर रोजी सोलापूर येथे प्रसिद्ध अभिनेते आणि कवी किशोर कदम यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण झाले.

## मनोरमा साहित्य पुरस्कार




आपल्या अनुवादातून मराठी वाचकांना कन्नड साहित्याची ओळख घडवून देणाऱ्या अनुवादक म्हणजे सौ. उमा कुलकर्णी.

उमा कुलकर्णी यांच्या या साहित्यिक योगदानाची दखल घेत सोलापूर येथील मनोरमा साहित्य मंडळीमार्फत त्यांना विशेष पुरस्काराने पुरस्कृत करण्यात आले.

२५ डिसेंबर रोजी सोलापूरच्या रंगभवन सभागृहात माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण झाले.


## परमपूज्य दलाई लामांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन



नोबेलविजेते बौद्ध धर्मगुरू परमपूज्य चौदावे दलाई लामा लिखित आणि मेहता पब्लिशिंग हाऊसद्वारा अनुवादित दोन मराठी पुस्तकांचे दलाई लामा यांच्या हस्ते बांबोली, गोवा येथे प्रकाशन झाले. आपले विचार मराठी वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मराठी प्रकाशक पुढे येत असल्याबद्दल यावेळी दलाई लामा यांनी समाधान व्यक्त केले.

गोव्यातील बांबोली येथे या पुस्तकाचे अनावरण झाले.

दलाई लामा यांचे Towards the true kinship of faiths पुस्तक 'धर्मांमधील बंधुत्वाच्या मार्गावर' या नावाने तर त्यांचे The book of Joy हे पुस्तक 'परमसुखाची पर्वणी' नावाने मराठीत प्रकाशित झाले. 'धर्मांमधील बंधुत्वाच्या मार्गावर' हे पुस्तक जगभरातील धर्मांच्या सहअस्तित्वातही एकोप्याचा संदेश देते. धार्मिक तेढ आणि जातीपातींच्या संघर्षात होणारा मानवी मूल्यांचा ऱ्हास अधोरेखित करत दलाई लामा सर्व धर्मांतील समान सूत्र मांडतात. करुणा हे एक मूल्य जगभरच्या धर्मांचे मार्गदर्शक तत्त्व असल्याची मांडणी या पुस्तकात पाहायला मिळते.




दलाई लामा यांचे दुसरे पुस्तक 'परमसुखाची पर्वणी' माणसाच्या सुखाच्या व्याख्या आणि भौतिक आनंद यातील फरक स्पष्ट करते. दक्षिण आफ्रिकेचे आर्चबिशप डेस्मंड टुटू आणि दलाई लामा यांच्या दरम्यान झालेल्या संभाषणातील आनंद व प्रसन्नतेचा संदेश सर्वांपर्यंत नेण्याचा प्रयत्न या पुस्तकात दिसून येतो. या पुस्तकात दलाई लामांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचं सार सामावलेलं आहे.

दलाई लामा यांच्या पुस्तकांचा जगातील सोळा भाषांमध्ये अनुवाद झाला आहे. लामा यांचे विचार मराठी वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी दलाई लामा ट्रस्टकडून मेहता पब्लिशिंग हाऊसची निवड करण्यात आली. मेहता पब्लिशिंग हाऊससाठी ही सन्मानाची गोष्ट असल्याची प्रतिक्रिया या छोटेखानी कार्यक्रमात मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक सुनील मेहता यांनी व्यक्त केली.

◆

श्र
द्धां
ज
ली

'पर्याय शब्दकोशा'चे जनक श्री. वि. शं. ठकार यांचे ४ डिसेंबर, २०१९ रोजी निधन झाले. मराठी भाषेतील वैविध्य आणि समृद्धी दाखवणाऱ्या पर्याय शब्दकोशाने वाचकांच्या अनेक पिढ्यांना समानअर्थी शब्दांचा अनमोल ठेवा दिला. या पर्याय शब्दांचे कोशकार श्री. ठकार यांच्या जाण्याने मराठी साहित्यविश्वात पोकळी निर्माण झाली आहे. या शब्दरथीला मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुक सेलर्स यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली!

**'पर्याय शब्दकोशा'चे जनक...**

काही व्यक्ती आपल्याला प्रत्यक्ष भेटत नाहीत; पण त्यांचे व्यक्तिमत्त्व व योगदान यातून त्यांची प्रतिमा निर्माण होते. नुकतीच वि. शं. ठकार यांचे निधन झाल्याची बातमी वाचली. त्यांची-माझी ओळख त्यांनी लिहिलेल्या 'इंग्रजी मराठी पर्यायकोशा'तून झाली. साधारण चार वर्षांपूर्वी मी मराठीत काही तांत्रिक विषयांवर लेखन करीत होतो. या पुस्तकाचा मला प्रचंड उपयोग झाला. यातले मराठी अनेक पर्यायी शब्द ठकार सरांनी अत्यंत परिश्रमाने एकत्र केले आहेत. ते वाचूनच थक्क व्हायला होते. चार महिन्यांपूर्वी ठकारांशी फोनवर बोललो होतो, त्या वेळी 'अजून एक कोश करीत आहे,' असे ते म्हणाले होते. त्यांना आवर्जून भेटायचे होते, पण राहून गेले. त्यांना आदरांजली!

- **श्रीरंग गोखले, पुणे**

महाराष्ट्र टाइम्स, २५.१२.२०१९

## किस्सा • ए • पब्लिशिंग

मराठी प्रकाशनाचा आद्य प्रवर्तक कलकत्त्याचा डॉ. विल्यम कॅरी हा होय. तत्पूर्वी हस्तलिखिते रूढ होती. ती तयार करताना वाटोळे, सरळ आणि मोकळे अक्षर असलेल्या ओळी व वेलांट्या, कानेमात्रे नीट असलेले, पहिल्यापासून शेवटपर्यंत एकाच वळणाचे, एकटाकी अक्षर लिहू शकणारे लेखनिक या कामावर नेमण्यात येत. ग्रंथ लिहिणाऱ्यास महिना तीन रुपये लिहिणावळ मिळे. त्यामुळे साहजिकच ग्रंथ महाग पडत. महाभारतासारख्या ग्रंथाला त्या काळी रु. १५०-२०० द्यावे लागत. महाराष्ट्रात छापून तयार झालेले पहिले पुस्तक 'पंचोपाख्यान' हे होय. १८२२ मध्ये बॉम्बे करिअर या छापखान्यात छापून ते प्रसिद्ध करण्यात आले होते. बॉम्बे ट्रँक्ट अँड बुक सोसायटी व अमेरिकन मिशन यांनी प्रकाशनास यानंतर सुरुवात केली; परंतु त्या काळातील अनेक पुस्तके काळाच्या उदरात गडप झाली. १८४७ चा लेखाधिकाराचा कायदा (इंडियन कॉपीराइट ॲक्ट) संमत झाल्यामुळे ग्रंथकारास संरक्षण मिळाले, तर १८६७ च्या ग्रंथनोंदणी कायद्यामुळे सरकारकडे पुस्तके येऊ लागली. १८६७ च्या पूर्वीच्या प्रकाशित ग्रंथास 'दोलामुद्रिते' वा 'आद्यमुद्रिते' असे नाव देण्यात आले. दोलामुद्रितांच्या या काळात मराठी भाषेत १२८ प्रकाशकांनी ४३५ ग्रंथ प्रकाशित केले. सुरुवातीच्या काळात प्रकाशने शिलामुद्रित असत. १८६७ नंतर खिळामुद्रण सुरू झाले. टॉमस ग्रॅहॅम यांनी मुद्रणकलेची पद्धतशीर प्राणप्रतिष्ठा केली आणि त्यांचे शिष्य गणपत कृष्णाजी, जावजी दादाजी यांनी आपल्या मुद्रण व्यवसायाला प्रकाशनाची जोड दिली. मराठीतील पहिले पंचांग १८५८ मध्ये गणपत कृष्णाजी यांनी शिळाप्रेसवर छापले. सुरुवातीच्या काळात कॅरी, एल्फिन्स्टन, कँडी, जाव्हिस, मोल्सवर्थ या ब्रिटिशांनी मराठी भाषेवर प्रेम केले. ती भाषा हस्तगत केली आणि आपल्या अभ्यासाने व ज्ञानाने मराठी मातृभाषा असणाऱ्या व पंडितांशी चर्चा करून काही प्रकाशनेही केली.

◆

पुस्तक परिचय

‘वाचायलाच हवं असं प्रेरणादायी’ - सचिन तेंडुलकर




# चेहऱ्यामागची रेश्मा

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**रेश्मा कुरेशी** । सहलेखक : **तानिया सिंग**

अनुवाद

**निर्मिती कोलते**

ॲसिड हल्ला झालेल्या रेश्मा कुरेशी ह्या १७ वर्षीय तरुणीने सांगितलेली ही गोष्ट! तिचे बालपण, हल्ल्याची पार्श्वभूमी, प्रत्यक्ष हल्ला आणि त्यानंतरचा तिचा लढा अशी तिच्या आत्मकथेची बांधणी आहे. वेगवेगळ्या यथोचित शीर्षकाखाली खाली ते ते प्रसंग लिहिलेले आहेत. तिचे हल्ल्यापूर्वीचे आयुष्य, तिच्या घरचे वातावरण, आर्थिक परिस्थिती अशी सगळी पार्श्वभूमी सुरुवातीच्या भागात येते. सुरुवात अतिशय रंजक आहे. तिचे लहानपण, स्वप्ने, नातीगोती याबद्दल वाचताना तिच्या आयुष्याशी रिलेट होता येतं. भाषा ओघवती आणि सोपी आहे. तिच्या स्वभावाचे प्रतिबिंब सुरुवातीच्या भागात अधूनमधून कळत जाते.

हल्ला आणि त्याचे वर्णन अतिशय वास्तववादी आहे. कुठेही अतिरेकी आणि सहानुभूती मिळवण्यासाठी लिहिलेले वाटत नाही. लेखिका प्रसंग जसेच्या तसे उभे करण्यात यशस्वी झाली आहे. तिच्या वेदनेशी, दु:खाशी कुठेतरी नाळ जुळत जाते वाचताना. तिचा लढा, तिची धडपड, तिने दाखवलेले धैर्य हे खरच प्रेरणादायी आहे. अशा प्रेरणादायी सत्यकथा वाचकाला नेहमीच स्वत:च्या आयुष्याकडे पाहण्याची एक नवी दृष्टी देतात. आपल्या आयुष्यात आलेल्या बऱ्या-वाईट घटनांचे पुस्तकातल्या गोष्टींशी साधर्म्य शोधले जाते. रेश्माच्या लढाईतूनसुद्धा वाचकाला आपल्या लहान-मोठ्या लढाया लढण्यासाठी नक्कीच बळ मिळेल. अशा संकटाला तोंड देतानाच बाकीच्या समस्यांचा ऊहापोहसुद्धा केला गेला आहे. मुस्लीम समाजाचे प्रश्न मांडले गेलेत. अशा पीडितांबाबतची समाजाची एकंदरीत भूमिका, वैद्यकीय व्यवसायातील भावनाशून्य विचारसरणी, जग इतके पुढे गेलेले असतानाही आपल्याकडचे स्त्रियांचे स्थान, हुंडा आणि घटस्फोट यातून निर्माण झालेले प्रश्न या सगळ्या प्रश्नांचे महत्त्व अधोरेखित होते. काही गोष्टी कथा वाचताना अनुत्तरित राहतात, जसे की जलालुद्दीनचे पुढे काय झाले? कोर्टातल्या लढाईचे तपशील किंवा ती सध्या शिकतेय का? कदाचित तिचा स्वत्व शोधण्याचा लढा जास्त महत्त्वाचा असल्याने हे तपशील फार मांडले गेले नसावेत, असे वाटते.

तिच्या लढ्यातून पुढे आलेली सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सुटी आणि सहज ॲसिड विक्री थांबवण्यासाठी तिने आणि काही संस्थांनी घेतलेला पुढाकार आणि त्याला आलेले यश. मराठी रसिकांना रेश्माच्या गोष्टीतून एका

१७ वर्षांच्या कोवळ्या मुलीचा ॲसिड हल्ला झेलण्याचा थरार, तिचा प्रचंड कठीण असा मानसिक, शारीरिक संघर्ष समजून घेता येईल. तिच्या घरच्यांचा भक्कम आधार, इतर सामाजिक संस्थांचा पुढाकार, तिच्या मैत्रिणींच्या मदतीने परत मिळवलेला आत्मविश्वास नक्कीच प्रेरणादायी आहे आणि मराठी रसिकांना या आत्मकथेचा अनुवाद वाचायला नक्कीच आवडेल.

◆

## फेसबुकवरील चर्चेतील पुस्तक – 'स्वामी'

*''मी एकदा वाचलेले पुस्तक परत वाचत नाही; पण हे एकमेव पुस्तक त्याला अपवाद आहे. चारदा वाचले आहे. मुलांना मानगूट पकडून वाचायला लावले आहे!''*

**– एकनाथ मराठे**

*''रणजित देसाई यांची ही सर्वोत्तम कादंबरी आहे. माझी सगळ्यात आवडती कादंबरी.''*

**– सुजय गोरे**

*''ललितरम्य, ओघवती व संवेदनशील भाषाशैली आणि प्रत्ययकारी वर्णन. मनाला चटका लावणारे संवाद. कथा माहीत असूनही उत्सुकता जागविणारी कादंबरी.''*

**– हरिहर सारंग**

*''संपूर्ण कादंबरी अखंड वाचायची ओढ सुटत नाही... पण शेवटची तीस-चाळीस पाने वाचताना मात्र डोळ्यांना अखंड धारा लागतात... ते वाचताना सगळं दु:ख छातीत कोंडलं जाऊन कधी श्वास रोधला जातो हे कळत नाही... रमा-माधवाचा शेवट वाचवतच नाही... कितीही वेळा वाचा... प्रत्येक वेळी हे असह्य दु:ख ठसठसत राहतं... उठता - बसता हाती असलेली ही कथा शेवटाला मात्र घात करते... एक एक पान मनाचा हिय्या करून वाचतेय... किती ते दु:ख... केवढी ती शोकान्तिका...''*

**– गायत्री पांगरकर**

## नवी संहिता... नवा आशय...

# साक्षी

**डॉ. एस.एल. भैरप्पा**

अनुवाद

**उमा वि. कुलकर्णी**




सत्या-असत्याच्या कल्पनांपुढे आव्हान उभी करणारी ज्येष्ठ लेखक एस. एल. भैरप्पा यांची नवी साहित्यकृती

**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


## अमेरिकन क्लासिक्स

# प्रायश्चित

**नेथानिएल हॉथॉर्न**

अनुवाद

**श्री. ना. पेंडसे**





सतराव्या शतकातही तथाकथित नैतिकतेला आव्हान देणाऱ्या नायिकेची अस्वस्थ करणारी गोष्ट... नेथानिएल हॉथॉर्न यांची अभिजात अमेरिकन साहित्यकृती.

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तकपरिचय

**नानाविध धर्मांतील बंधुत्वाचा समान धर्म शोधणारी परमपूज्य दलाई लामांची विचारगाथा...**




# धर्मांमधील बंधुत्वाच्या मार्गावर...

**(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)**

परमपूज्य **दलाई लामा**

अनुवाद

**रोहन टिल्लू**

दोन धर्मांमधील संबंधांचा इतिहास संघर्ष आणि सौदार्ह या परस्परविरोधी भावनांनी भरलेला आहे. ख्रिश्चनांनी चालवलेले क्रूसेड्स असोत किंवा इस्लामने पुकारलेला जिहाद असो, धर्माच्या आधारावर झालेल्या हिंसाचाराची अनेक उदाहरणं इतिहासात आहेत. जागतिकीकरणाच्या युगात जग हे एका खेड्यासारखं बनलं असताना धर्मांमधील परस्पर अविश्वास संघर्षाला तोंड फोडणारा ठरू शकतो. या संघर्षात संपूर्ण जगाचं नुकसान होऊ शकतं.

प्रसिद्ध बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांना या आव्हानाची जाणीव आहे. जगभर फिरणाऱ्या दलाई लामा यांनी बौद्ध धर्माबरोबरच विविध धर्मांच्या ग्रंथाचा अभ्यास केला आहे. या अभ्यासाअंती जगासमोरच्या या मोठ्या आव्हानावर त्यांनी सुचवलेला उपाय म्हणजे हे 'धर्मांमधील बंधुत्वाच्या मार्गावर...' हे पुस्तक! हे पुस्तक म्हणजे दलाई लामा यांनी विविध धर्मांबद्दल केलेलं मुक्त चिंतन आहे. जगातील सर्वच महान धर्मांची शिकवण, त्या धर्मांमधील तत्त्वे, आध्यात्मिक मूल्ये या सर्व गोष्टींची चर्चा त्यांनी या पुस्तकात केली आहे.

बौद्ध धर्मातील बोधिचर्यावतार असो किंवा भगवान गौतम बुद्धाची शिकवण असो, हिंदू धर्मातील भगवद्गीता असो किंवा रामायण असो, ख्रिश्चन धर्मातील बायबल असो, इस्लाम धर्मातील कुराण किंवा हादिथ असो, ज्यू धर्मातील तालमुड किंवा तोराह असो, शीख धर्मातील आदिग्रंथसाहिब असो या सर्वच ग्रंथांचा अभ्यास दलाई लामा यांनी केला आहे. या ग्रंथांमधून परावर्तित होणारी प्रत्येक धर्माची शिकवण, त्या धर्माचा गाभा त्यांनी जाणून घेतला आहे.


प्रत्येक धर्माने करुणेची शिकवण दिली असून, करुणा आणि संयम हाच या सर्व धर्मांच्या शिकवणीचा गाभा आहे, अशा निष्कर्षाप्रत दलाई लामा आले आहेत. धर्मावर विश्वास असलेले लोक असोत किंवा निधर्मी लोक असोत, प्रत्येकाने आपल्या मनात करुणेचा अखंड झरा वाहत ठेवला, तर ते संपूर्ण मानवजातीसाठी फायद्याचं ठरेल. दुसऱ्या धर्माचं अस्तित्व स्वीकारणं आणि त्याचा आदर करणं, हे प्रत्येक धर्माच्या अनुयायाने केलं, तर धर्माधर्मांमधील परस्पर समजुतीची भावना आणि एकोपा वाढीस लागेल, असं दलाई लामा म्हणतात.

जागतिकीकरणामुळे मानवजात ज्या आव्हानांना सामोरी जात आहे, त्या

आव्हानांचा सामना करण्यात धर्म अत्यंत महत्त्वाची आणि निर्णायक भूमिका बजावू शकतील, असा विश्वास दलाई लामा यांना वाटतो. एक चांगला माणूस, एक चांगला समाज आणि परस्पर समजुतीवर आधारित एक छान जग तयार करण्यात धर्म खूप उपयोगी ठरतील, असं ते ध्वनित करतात. ‘धर्मांमधील बंधुत्वाच्या मार्गावर...’ हे पुस्तक २१व्या शतकातील जागतिक आव्हानांना चांगलं उत्तर ठरेल.

◆

## अभिप्राय – कॉर्पोक्षेत्र




आधुनिक महाभारताची विनोदी गाथा... महाभारत आणि रामायण तसे हिंदू धर्माची अस्मितेची प्रतिके.

लहानपणापासूनच या साहित्याची ओळख आपआपल्यापरीने प्रत्येक कुटुंबात करून दिले जाते. पण तुमच्या हातात जर हेच महाभारत, त्यातील सर्व पात्रे फक्त आधुनिक व कॉर्पोरेट क्षेत्राशी संबंधित पद्धतीने जुळवून आले तर किती आनंददायी अनुभव असेल नाही का? कॉर्पोक्षेत्र हे पुस्तक म्हणजे एमबीए युगातील महाभारत वाचकांसमोर ठेवते. त्यातून मराठी वाचकांना हे पुस्तक पुराणातील अनुभव देण्यासोबतच आधुनिक दृष्टी देईल. आजच्या काळात महाभारतातील पात्रांशी काही संबंध शोधण्याचा प्रयत्न करेल. कॉर्पोक्षेत्र यातील कथा ज्या रंजक शैलीने आणि विनोदीपद्धतीने मांडतानाच युवकांचा विचारप्रवाह बदलू शकेल इतकी सामर्थ्यशाली आहे. महाभारताची आधुनिक ही गाथा मनोवेधक आहे.

**– दीपक कुलकर्णी**

दै. लोकमत ८.१२.२०१९

## जगभरात विक्रमी विक्री झालेली डेल कार्नेगी यांची ३ नवी पुस्तके





### स्वत:ला अविस्मरणीय बनवा

आत्मविश्वास असो वा, असो सुसंवाद
स्वत:ला बनवा माणूस खास...

### आवश्यक अशी पाच लोककौशल्ये

विसंवादाच्या तणावाला करा रामराम...
डेल कार्नेगींच्या लोककौशल्यांचा उपाय रामबाण...








### प्रभावशाली संभाषणाचा झटपट व सोपा मार्ग

चारचौघात दिसेल रुबाब...
सभेमध्ये पडेल छाप...
आजमावून पाहा डेल कार्नेगींच्या मंत्राची साथ...

पुस्तक परिचय

**आयुष्यातील अटळ दुःखातही परमसुखाचा**
**मार्ग दाखवणारं**
**दोन परमपूज्य धर्मगुरूंचं पथदर्शक विवेचन...**




# परमसुखाची पर्वणी

**(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)**

परमपूज्य **दलाई लामा** आणि
आर्चबिशप **डेस्मंड टुटू**
सहलेखक
**डग्लस अब्राम्स**
अनुवाद
**मुक्ता देशपांडे**

## परमसुखाची पर्वणी देणारं पुस्तक...

दु:ख आणि अडचणी जर माणसं स्वत:च निर्माण करत असतील तर आनंद आणि प्रसन्नताही त्यांना निर्माण करता येणार नाही का, तर येईल, असं दलाई लामा आणि डेस्मंड टुटू यांना खात्रीपूर्वक वाटतं. आणि हाच मंत्र त्यांनी 'द बुक ऑफ जॉय' या पुस्तकातून दिला आहे. या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद म्हणजे 'परमसुखाची पर्वणी' हे मेहता पब्लिशिंग हाऊसचं पुस्तक होय.

२०१५ मध्ये एक आठवड्यासाठी आर्चबिशप डेस्मंड टुटू आणि हिज होलीनेस दलाई लामा धरमसाला इथे भेटले तेव्हा त्यांच्या मनात दोन उद्दिष्टं होती. पहिलं (आणि अर्थात जास्त महत्त्वाचं) उद्दिष्टं होतं दलाई लामांचा ८०वा वाढदिवस साजरा करणं आणि कदाचित दोन्ही मित्रांच्या या शेवटच्या ठरू शकणाऱ्या भेटीचा पुरेपूर आनंद लुटणं, मौल्यवान वेळ एकमेकांबरोबर घालवणं. दुसरं उद्दिष्टं म्हणजे 'द बुक ऑफ जॉय' या पुस्तकाचं लेखन. संपादक डग्लस अब्राम्स यांच्या मदतीने दोन्ही आध्यात्मिक नेते आठवडाभर आनंद, प्रसन्नता यावर बोलले, त्यांच्या खऱ्या स्वरूपावर चर्चा केली, प्रसन्नतेच्या मार्गात येणाऱ्या अडथळ्यांवर नेमकं बोट ठेवलं आणि तिला आपल्या दैनंदिन आयुष्याचा भाग कसं बनवायचं याबाबत मार्गदर्शन केलं. या दोन्ही नेत्यांची पार्श्वभूमी आणि धर्म अत्यंत वेगळे असूनही आनंद आणि दु:ख याबाबतची त्यांची मतं खूप सारखी आहेत. प्रत्येक माणूस आनंदी, प्रसन्न आयुष्य जगू शकतो यावर त्यांचा केवळ विश्वास नाही, तर आनंदी आयुष्य जगलेच पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.

पृथ्वीतलावरच्या सर्वाधिक प्रसन्न आणि आनंदी असलेल्या या व्यक्ती आत्यंतिक क्लेशकारक आणि निर्वासित आयुष्य जगत आल्या आहेत यावर विश्वास ठेवणं कठीण आहे. या दोन्ही आध्यात्मिक नेत्यांना जबरदस्तीने गृहत्याग करावा लागला. त्यांच्या जवळच्या लोकांवर कोसळलेले दु:खाचे डोंगर त्यांना उघड्या डोळ्यांनी बघावे लागले, त्यांना दु:खाच्या खाईतून बाहेर काढावं लागलं. दोघंही मानवी हक्क चळवळीचे अध्वर्यू आहेत, ज्यांनी माणुसकी पायदळी तुडवणारी अधम कृत्यं पाहिली आहेत. इतक्या हालअपेष्टांना सामोरे गेल्यानंतरही आजूबाजूला मनाला आनंद देणाऱ्या गोष्टी त्यांना दिसू शकतात यावर विश्वास बसत नाही.

अशा परिस्थितीमुळे तुम्ही आणखी उदास कसे होत नाही, असं विचारलं

असता दलाई लामांनी एक वेगळाच दृष्टिकोन समोर ठेवला. त्यांनी त्यांचं घर गमावलं असलं आणि ते निर्वासित आयुष्य जगत असले तरी अनेक दशकं त्यांना जो प्रवास करण्याचा आणि वेगवेगळ्या लोकांना भेटण्याचा अनुभव मिळाला, तसा त्यांना एरवी मिळाला नसता. आता मागे वळून पाहता, या निर्वासित अवस्थेने त्यांना ज्या संधी उपलब्ध करून दिल्या, त्यामुळे हे आयुष्यच आपल्याला जगायला आवडेल असंही त्यांना वाटलं. स्वत:साठी आनंद निर्माण करण्याचा सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे इतरांसाठी आनंद निर्माण करणं होय, असं आर्चबिशप डेस्मंड टुटू आणि हिज होलीनेस दलाई लामा यांचं मत आहे. इतरांच्या आनंद आणि दु:खाचा आपण मनापासून जेव्हा विचार आणि काळजी करतो तेव्हा या जगात आपण एकटे नसल्याची जाणीव व्हायला लागते आणि त्यामुळे आपलं दु:ख कमी होतं. पूर्वलक्ष्यी दृष्टिकोण ठेवून आपण जेव्हा इतरांना आनंद देण्याचा प्रयत्न करतो तेव्हा या आनंदाचा शिडकावा आपल्या मनावर आपोआपच होतो. करुणेबरोबरच प्रसन्नता आपोआपच येते किंवा ती आनुषंगिक असते, असं ते सांगतात.

दलाई लामांचा असा दावा आहे की, माणसं जर स्वत:साठी दु:ख निर्माण करू शकतात तर स्वत:साठी आनंदही निर्माण करू शकतात. आयुष्यात अधिक प्रसन्नता, अधिक आनंद प्राप्त करण्यासाठी माणूस स्वत:च्या अंगी बिंबवू शकेल असे आठ गुण किंवा प्रसन्नतेचे आठ स्तंभ ते नमूद करतात. त्यातले चार गुण हे मनाशी, तर चार गुण हृदयाशी संबंधित आहेत.

आपल्याबाबतीत घडणाऱ्या घटनांचे असंख्य प्रकारे अर्थ लावता येतात. आपलं परिप्रेक्ष आपल्यापुरतं संकुचित न ठेवता विशाल केलं तर स्वत:च्या दु:खाचे अवडंबर माजवण्यापासून आपण स्वत:ला वाचवू शकतो.

समाजानं दोघांना देऊ केलेलं सन्माननीय स्थान आर्चबिशप टुटू आणि दलाई लामा यांना मान्य नाही. इतर सर्वसामान्य लोकांशी वैचारिक देवाण-घेवाण करणारे आपण सामान्य लोक आहोत, असं त्यांचं मत आहे. आनंदी आयुष्य जगण्याची इच्छा असणारी आपण सगळी सामान्य माणसं आहोत असं ते म्हणतात. हास्य ही सगळ्यांना एकत्र आणणारी पृथ्वीवरची सगळ्यात प्रभावी शक्ती आहे आणि या दोन्ही नेत्यांना हसण्या-हसवण्याची असलेली आवड धार्मिक नेत्यांच्या एकंदर प्रतिमेला छेद देणारी आहे, असेच म्हणावे लागेल. स्वत:वर आणि जीवनातल्या विसंगतीवर हसण्याची क्षमता सगळ्या माणसांना

समान पातळीवर आणून उभी करते. शिवाय, हसल्यामुळे छान वाटतं! नकार आणि पराभव यांच्या अगदी उलट म्हणजे स्वीकार, हे प्रसन्न मनोवृत्तीचं व्यवच्छेदक लक्षण मानलं गेलं आहे, हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. जग सध्या ज्या अवस्थेत आहे ती वस्तुस्थिती नाकारून आपण तिच्यात सुधारणा घडवू शकत नाही, असं आर्चबिशप टुटू स्पष्ट करतात. वास्तव बदलण्यापूर्वी सर्व गुण-दोषांसकट आपण वस्तुस्थितीचा स्वीकार करायला शिकलं पाहिजे.

'क्षमा करा आणि विसरून जा' या सहसा वापरल्या जाणाऱ्या उक्तीच्या उलट दलाई लामा म्हणतात की, इतरांच्या क्रौर्याचा स्वीकार करणं म्हणजे क्षमाशीलता नव्हे, तर त्या माणसांमधलं क्रौर्य बाजूला ठेवून त्यांच्यातील माणुसकीची आठवण ठेवणं म्हणजे क्षमाशीलता. राग आणि तिरस्कार त्यांनाच हानी पोचवू शकतात, ज्यांना या भावना जाणवतात किंवा जे या भावना मनाला लावून घेतात. जर स्वीकार म्हणजे वास्तवाला नाकारण्यास दिलेला नकार असेल तर कृतज्ञता म्हणजे वास्तवाचं खुल्या दिलानं केलेलं क्रियाशील स्वागत होय. 'नाही रे' कडून 'आहे रे' कडे झालेला विचारांचा प्रवास आपल्या जीवनविषयक दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडवून आणू शकतो. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपल्याकडे अनेक गोष्टी असतात आणि त्यांची सतत आठवण आपल्या शरीर-मनासाठी संजीवक ठरते. माणूस हा सामाजिक प्राणी आहे आणि दलाई लामांच्या म्हणण्यानुसार इतरांच्या आयुष्याची मनापासून काळजी करणे, ही आनंदी आयुष्याची गुरुकिल्ली आहे. इतरांच्या प्रति करुणा बाळगण्याने आपलीच उन्नती होते; जेव्हा आपण इतरांशी दयाबुद्धीनं वागतो तेव्हा त्यांनाही आपल्याशी प्रेमानं वागण्याची इच्छा होते. औदार्य हे करुणेचं, दयाबुद्धीचं विस्तारित रूप भासत असलं तरी फरक हा आहे की औदार्य दाखवण्यासाठी करुण भाव दृगोच्चर होण्याची वाट पाहणं गरजेचं नसतं. करुणा हा स्थायीभाव आहे तर औदार्य ही कृती आहे. माणसाला येणाऱ्या अनुभवांमधला हा सर्वोत्तम अनुभव असल्यामुळे प्रत्येक प्रमुख धर्मामध्ये त्याचा उल्लेख केला गेला आहे.


नोबेल पारितोषिक विजेते हिज होलीनेस दलाई लामा आणि आर्चबिशप डेस्मंड टुटू यांनी आयुष्याची तब्बल पन्नास वर्षं निर्वासित अवस्थेत काढली आणि अस्तित्वालाच समूळ नष्ट करू पाहणाऱ्या हिंसक जुलूमशाहीचा सामना केला. अशा विपत्तींना तोंड देऊनही किंवा त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, त्या

विपत्तींमुळेच ते दोघेही या पृथ्वीतलावरचे सर्वांत आनंदी आणि प्रसन्नचित्त लोक आहेत. त्यांच्या प्रसन्नचित्त स्वभावामागचं रहस्य या पुस्तकाच्या पानापानांतून वाचकांसमोर खुलं होतं.

स्वागताच्या आलिंगनापासून ते अखेरच्या निरोपापर्यंतचा त्या दोघांनी व्यतीत केलेला अभूतपूर्व आणि विस्मयकारक आठवडा अनुभवण्याची अपूर्व संधी हे पुस्तक आपल्याला देतं. मुक्ता देशपांडे यांच्या सकस अनुवादाने पुस्तकाला खरा न्याय दिला आहे. परमपूज्य दलाई लामा आणि आर्चबिशप डेस्मंड टुटू यांचा जीवनसंदेश त्यांच्या शब्दांतून नेमकेपणाने उतरला आहे.

◆


## अभिप्राय – लेट हर फ्लाय



झुंजार व विश्वव्यापक लढा... 'लेट हर फ्लाय' पुस्तकात पाकिस्तानातील डोंगरदऱ्यांमध्ये वसलेल्या छोट्याशा खेड्यातील एका लहान मुलाचा प्रवास मांडला आहे. ज्याने पुढे जगभरात समानता आणण्यासाठी अथक परिश्रम घेतले. झियाउद्दीन यांनी दहशत आणि आर्थिक दुर्बलता अशा दोन्ही पातळ्यांवर परिस्थितीशी झुंजत जगासमोर नवा आदर्श उभा केला. तसेच यापुढे एक पाऊल टाकत त्यांचा लढा वीस वर्षांपासून विश्वव्यापक केला. त्यातूनच ते आजतागायत जगातील सर्व मुलींसाठी लढा देत आहेत. 'लेट हर फ्लाय' मधील युसूफभाई यांचा प्रवास जगभरातील मुली आणि स्त्रियांसाठी प्रत्येकाने 'का लढा दिला पाहिजे?' हा संदेश पोहोचवतो.

**– दै. लोकमत, २२.१२.२०१९**


## नवी संहिता... नवा आशय...



आईसह सहा भावांची एकाच दिवशी हत्या
आणि आयसिसची लैंगिक गुलामगिरी...
पण तरी नादिया मुरादनं दहशतवादाविरुद्ध
लढा देत नोबेल पुरस्कारावर मोहोर उमटवली...
अशा धैर्यशालिनीची आत्मकथा.
द लास्ट गर्ल
नादिया मुराद
अनुवाद : सुप्रिया वकील
नोबेल शांतता पुरस्कार विजेती
द लास्ट गर्ल
नादिया मुराद
द लास्ट गर्ल

पुस्तक परिचय

आगीनगाडी पाहून घाबरलेली जनता...
विकासाच्या प्रवासाला समजलं गेलं भूतबाधा...
भारतातल्या पहिल्या आगीनगाडीच्या खुमासदार
गोष्टींनी सजलेलं पुस्तक...




# कहाणी
# पहिल्या आगीनगाडीची

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**राजेंद्र आकलेकर**

अनुवाद

**रोहन टिल्लू**

‘हॉल्ट स्टेशन इंडिया’ या राजेंद्र आकलेकर यांच्या (संशोधनावर आधारित) इंग्रजीतील ऐतिहासिक व माहितीपूर्ण पुस्तकाचा रोहन टिल्लू यांनी मराठीत अनुवाद केला आहे. भारतात पहिली ट्रेन १६ एप्रिल, १८५३ रोजी बोरीबंदर (व्हिक्टोरिया टर्मिनस - आताचे छत्रपती शिवाजी टर्मिनस) ते ठाणे या स्थानकांदरम्यान १४ डब्यांसह ३४ किलोमीटरच्या अंतरामध्ये धावली. यामध्ये भारतातील पहिला ‘प्रायोगिक’ रेल्वेमार्ग मुंबईपासून तयार होण्याची प्रक्रिया, त्यामध्ये वेळोवेळी आलेल्या अडचणी (दलदलीचा प्रदेश, कामगारांचा संप वगैरे) आणि त्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी काढलेला तोडगा, तसेच प्रत्यक्ष ही रेल्वे धावण्याचा ‘याची डोळा; याची देही’ लोकांनी पाहिलेला व अनुभवलेला थरार याचे यथार्थ वर्णन आले आहे. या घटनेच्या २९ वर्षं आधी एकाच जागी स्थिर असलेलं वाफेवर चालणारं पहिलं इंजिन मुंबईत सुरू झालं होतं. हे वाफेवरचं इंजिन म्हणजे ट्रेन खेचणाऱ्या मोठाल्या इंजिनांचं जनक होतं. या वाफेवरच्या इंजिनांनीच भारतात रेल्वेच्या युगाची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. प्रथम व्यापार करण्याच्या निमित्ताने म्हणून ब्रिटिश लोक अर्थात इंग्रज भारतात आले. १८५३च्या सुमारास ब्रिटिश राजघराण्याच्या वतीने ईस्ट इंडिया कंपनीच भारतातला सर्व कारभार सांभाळत होती. व्यापार करणे सुलभ व्हावे यासाठी त्यांनी येथे काही सुधारणाही केल्या. त्या वेळी परदेशाशी प्रामुख्याने समुद्रमार्गाने व्यापार चालत असे. भारतातील ठिकठिकाणचा कच्चा माल (उदा. कापसाच्या गाड्या) बंदरापर्यंत आणणे आणि इंग्लंडमधील तयार पक्का माल (उदा. कापडाचे तागे) या देशात सर्वत्र पाठवणे यासाठी येथे रेल्वे सुरू करण्याची कल्पनाही इंग्रजांचीच! त्यानंतर लष्करीदृष्ट्या या रेल्वेला महत्त्व आलं; प्रवासी वाहतूकही केली जात होती. भारतात ब्रिटिशांचे राज्य असताना प्रथम रेल्वे धावली, त्या वेळची त्या काळातील परिस्थिती आणि बदलत्या काळानुसार झालेल्या सुधारणा, विकास व तांत्रिक प्रगतीमुळे निर्माण झालेली सध्याची परिस्थिती याचा यामध्ये लक्षपूर्वक सविस्तर वेध घेतला आहे. काळानुरूप रेल्वेला अफाट लोकप्रियता मिळाली आणि या खंडप्राय देशात रेल्वेचं जाळं आडवं-उभं पसरलं. रेल्वेच्या विस्तारित जाळ्याबरोबरच तदनुषंगिक घटना/प्रसंग, तसेच प्रत्येक रेल्वे स्थानकाच्या (विशेषत: मुंबईतील) निर्मितीचा थोडाफार इतिहास आणि त्या संदर्भातील छोटे उपकथानक या सर्वांचा रोचक, ऐतिहासिक वृत्तांत या पुस्तकात दिला आहे.

त्याप्रमाणेच रेल्वेच्या आठवणी, काही खासगी नोंदी, लोकांशी झालेला पत्रव्यवहार, त्यातून कळलेले काही किस्से, देशातील रेल्वेच्या आगमनाबद्दल लोकांनी लिहून ठेवलेल्या गोष्टी यांनी पुस्तकाला वेगळीच उंची प्राप्त करून दिली. या सगळ्या अद्‌भुत व चित्ताकर्षक तपशीलवार गोष्टींमुळे त्या सोनेरी दिवसांचं चित्रच जणू डोळ्यांसमोर उभं राहतं.

◆


**नवी संहिता... नवा आशय...**

बच्चेकंपनीसाठी गोष्टींची गंमत... **शंकर सारडा** लिखित



**जादूमंतर छू आणि इतर कथा**




“कथा अफलातून
जादुगारांच्या आणि
विस्मयकारक
कल्पकतेच्या!”

**मर्कट राजा आणि इतर कथा**





हा मर्कटराजा
आहे भला शक्तिवान
आणि मोठा अक्कडबाज!
त्याच्या मस्त करामती
करतील तुमचे मस्त
मनोरंजन!

**किंमत : प्रत्येकी १९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता... नवा आशय...

भारतीय
सर्जनशील मनावर
गोंदण कोरणारी
**बिभूतिभूषण बॅनर्जी** यांची
अभिजात बंगाली कादंबरी
खास मराठी वाचकांसाठी...





# पथेर पांचाली



**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तक परिचय

'बहुरंगी प्रतिभे'चे वारसदार विजय तेंडुलकर यांचा
विस्मृतीत गेलेला अमेरिकन क्लासिक्सचा
दुर्मिळ अनुवाद.
तब्बल पन्नास वर्षांनंतर पुन्हा वाचकांच्या भेटीस...




# आगे बढो

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**जीन ली लेथम**

अनुवाद

**विजय तेंडुलकर**

## एका दर्यावर्दीच्या स्वप्नाची आगळी, प्रेरणादायक कहाणी...

एखाद्या माणसाचं स्वप्न काहीतरी वेगळं असतं; पण त्याला दुसऱ्याच क्षेत्रात जावं लागतं; पण त्या दुसऱ्या क्षेत्रात जाऊनही तो आपलं स्वप्न खूप वेगळ्या पद्धतीने पूर्ण करतो. अशी उदाहरणं अपवादात्मक आहेत. अशाच अपवादात्मक उदाहरणांपैकी एक होता नॅट अर्थात बो-डिच. गणिती व्हायचं स्वप्न बघणारा नॅट जहाजावर हिशेबनीस म्हणून नोकरीला लागला. त्या नोकरीची आणि गणिताबद्दलच्या प्रेमाची त्याने कशी सांगड घातली, याचं चित्रण करणारी कादंबरी आहे 'CARRY ON, Mr. BOWDITCH.' जे. एल. लेथम यांनी ही कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीचा अनुवाद केला आहे विख्यात नाटककार/लेखक विजय तेंडुलकर यांनी. 'आगे बढो' हे या कादंबरीचं मराठी शीर्षक.

नॅट अर्थात बो-डिचला लहानपणापासूनच गणित विषयाची, काही नवे जाणून घेण्याची, ते करून पाहण्याची आवड होती. शाळेत तर तो सर्वांत आधी तोंडी गणित सोडवून मला आणखी मोठे गणित सोडवायला द्या, असे सांगून मास्तरांना थक्क करून सोडत असे. मोठेपणी हार्वर्ड विद्यापीठात शिकून पदवी मिळवण्याची त्याची इच्छा होती; पण घरच्या परिस्थितीमुळे शाळा सोडून त्याला वडिलांना त्यांच्या कामात मदत करावी लागत असे. कुटुंबातील जवळजवळ सर्व पुरुष दर्यावर्दी असल्याने साहजिकच नॅटलाही समुद्रप्रवासाची ओढ होती. गणित चांगले असल्यामुळे जहाजावर हिशेबनीस म्हणून काम करताना कप्तान व इतर खलाशांकडून तो सागरी प्रवासातील त्यांचे अनुभव जाणून घेत असे. नॅट हिशेबाच्या कामात तर तरबेज होताच; पण ते काम पूर्ण झाल्यावर फावल्या वेळामध्ये तो पुस्तके (विशेषत: जलप्रवासासंदर्भातील माहितीपूर्ण पुस्तके) वाचत असे, तसेच आवश्यकतेनुसार तो लॅटिन व स्पॅनिश याप्रमाणे देशोदेशीच्या भाषा शिकला.

नॅटचा हिशेबीपणा आणि उत्साही व मनमिळाऊ स्वभाव यामुळे जहाजाचे मालक आणि कप्तान यांच्याकडून त्याला एकापाठोपाठ एक समुद्र प्रवासासाठी बोलावणे येत असे आणि प्रत्येक वेळी तो अतिशय उत्साहाने त्यात सहभागी होत असे. तसेच जलप्रवासादरम्यान आपल्याकडे असलेले ज्ञान व अनुभवाविषयी जहाजावरच्या इतर नवीन खलाश्यांना तो माहिती देऊन मार्गदर्शन करीत असे. अमेरिकन आर्ट्स अँड सायन्सेस ॲकॅडमीचा 'फेलो'


म्हणून नॅटची निवड झाली होती. नॅटचे कौटुंबिक जीवन अन्य खलाश्यांप्रमाणेच होते. त्याला जीवनात एलिझाबेद आणि पोली अशा दोन प्रेमळ मैत्रिणी लाभल्या.

नॅटने गणिताच्या अभ्यासाच्या आधारे मूअरच्या 'नौकानयन' पुस्तकातल्या असंख्य चुका शोधल्या; प्रत्येक चुकीला नॅटकडे भक्कम गणिती पुरावा होता. या अनुभवामुळे नॅटने स्वत:च अशा प्रकारचे एक पुस्तक लिहायचे ठरवले. त्यामध्ये या पुस्तकातल्या माहितीव्यतिरिक्त इतरही बऱ्याच गोष्टी त्याने समाविष्ट केल्या आणि त्या साऱ्या साध्या खलाश्यांनाही समजतील, उपयोगी पडतील अशा सोप्या पद्धतीने, साध्या शब्दांत लिहिल्या. मुख्य म्हणजे या ग्रंथाबद्दल नॅटला नेहमीच हवीशी वाटत असलेली हार्वर्डची पदवी हार्वर्डमध्ये शिकायला न जाता मिळाली. तो 'मास्टर ऑफ आर्ट्स' झाला आणि त्याचे स्वप्न साकार झाले.

नॅटच्या जीवनाचा सकारात्मक प्रवास या कादंबरीतून साकार होतोच; पण सागरी जीवनाचंही जवळून दर्शन घडतं. तेव्हा अवश्य वाचावी अशी ही कादंबरी आहे.

◆


### पुस्तकात हरवलेली माणसं...



"कॉलेजचे दिवस, विश्वास पाटलांचे 'महानायक' वाचत होतो. दुपारी कॉलेज सुटल्यावर घरी जाण्यासाठी उल्हासनगरवरून लोकल पकडली. दुपार असल्याने गर्दी कमी होती. इंडिकेटर वर BL म्हणजे बदलापूर लोकल लावली होती. बदलापूरलाच उतरायचं, शेवटचं स्टेशन म्हणून मी निवांत. बॅगेतून कादंबरी काढली आणि वाचनाची तंद्री लागली आणि मग काय गाडी बदलापूर सोडून पुढे जायला लागल्यावर मी भानावर... सहप्रवाशांना विचारलं तर कर्जत लोकल होती, मग काय? वांगणीला उतरलो आणि पुन्हा परतीची लोकल पकडली, असा हा वाचनाचा छंद!! वेड लावतो."

**ॲड. पद्मनाभ कारखानीस**

## नवी संहिता... नवा आशय...




पुराणांतल्या
अद्‌भुत महिला...
लक्ष्मी... सरस्वती... पार्वती...
मनोरमा... लीलावती... सागरकन्या...
आणि अशा अनेक, ज्यांच्या शौर्यकथा
पुराणांतल्या कथांमध्येच बंदिस्त राहिल्या
त्या येताहेत आपल्या भेटीला...

प्रसिद्ध लेखिका
**सुधा मूर्ती**
यांनी दाखवलेलं स्त्रीसामर्थ्याचं विराट रूप...




# कल्पवृक्षाची कन्या

अनुवाद
**लीना सोहोनी**

**किंमत : १९०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तक परिचय

'अमेरिकन क्लासिक्स' मधील नवीन पुस्तक




# भल्या दिलाचा माणूस

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**जॅक शॅफिर**

अनुवाद

**विजय तेंडुलकर**

## एक अनाहूत पाहुणा आणि एक कुटुंब यांच्यातील भावबंधाचं हृद्य चित्रण

मराठी नाटकाला वास्तवाचं कोंदण देऊन एका विवक्षित उंचीवर पोचवणारे नाटककार, अशी विजय तेंडुलकरांची ओळख आहे; पण विजय तेंडुलकरांनी अनुवादही केला आहे. जॅक शॅफिर यांच्या 'शेन' या लघुकादंबरीचा अनुवाद त्यांनी केला. 'भल्या दिलाचा माणूस' या शीर्षकाने ही लघुकादंबरी आता नव्याने वाचकांच्या भेटीला आली आहे.

एक अनोळखी परदेशी सशक्त माणूस (अर्थात कादंबरीचा नायक शेन) घोड्यावरून एका वाडी-वस्तीत येतो. त्या वाडीतील एका कुटुंबात (नवरा-बायको आणि एक लहान मुलगा) एक दिवसाचा पाहुणा म्हणून राहतो. त्या सर्वांच्या आदरातिथ्याने, वागण्या-बोलण्याने भारावून जाऊन त्यांच्या आग्रहाखातर तेथेच राहू लागतो. त्या कुटुंबाला बारीकसारीक कामांसह मोठमोठ्या, शेतीच्या अवघड कामातही मदत करतो; सल्ला देतो. कुटुंबप्रमुखाच्या बायकोच्या हातचे पदार्थ आवडीने खातो; तिच्या स्वयंपाकाची स्तुती करतो. तिच्याशी आणि त्या लहान मुलाशी आपुलकीने बोलतो, वागतो. अशा तऱ्हेने तो त्या कुटुंबातलाच एक होऊन जातो.


त्या कुटुंबाच्या जमिनीवर एका तथाकथित बड्या जमीनदाराचा डोळा असतो; पण ती जमीन सहजासहजी आपल्याला मिळणार नाही, असे दिसताच तो दादागिरी करू पाहतो, काही पैसे देऊन ती जमीन विकत घेण्याचे आमिष दाखवतो; तरी जमीन आपल्या हाती येणार नाही, असे लक्षात येताच जमीनदार भाडोत्री मारेकऱ्याला बोलावून त्याच्याकरवी कुटुंबप्रमुखाचा खून करण्याची योजना आखतो. अशा वेळी शेन खंबीरपणे त्या कुटुंबाच्या पाठीशी उभा राहतो. तो स्वत: जीवावर उदार होऊन एकटाच त्याच्या घोड्यावरून मारेकऱ्याशी दोन हात करायला जातो. अर्थातच मारेकऱ्याबरोबर त्या लोभी जमीनदारालाही संपवतो. आणि तो जसा अचानक आला होता तसाच तेथे गुंतून न राहता अचानक नाहीसा होतो; निघून जातो; पण शेवटपर्यंत शेन नक्की कोण होता, हे लोकांना कळत नाही.

तसं पाहिलं तर अतिशय साधं-सरळ असं हे कथानक आहे. प्रथमपुरुषी निवेदनातून ते उलगडत जातं. त्यात फारसं नाट्य नाही; पण अशा

साहित्यकृतींचा विचार भावनेच्या अंगाने करावा लागतो. कुठेतरी माणुसकी शिल्लक आहे. किंवा माणसाच्या रूपात देवच गरजवंताच्या मदतीला धावतो, असा एक सश्रद्ध, सकारात्मक विचार या लघुकादंबरीतून वाचकांपर्यंत पोचतो. शेन आणि त्या कुटुंबाचे भावबंध वाचकाच्या मनाला स्पर्श करून जातात. वास्तवाचं हलाहल पचवत जगणाऱ्यांना अशा कादंबऱ्या ओॲसिससारख्या वाटतात. अशा ओॲसिसची गरज बहुतांश माणसांना असते. तेव्हा या सुखद अनुभूतीसाठी ही लघुकादंबरी अवश्य वाचली पाहिजे.

◆

**पुस्तकात हरवलेली माणसं...**



''मी नाशिकच्या एका सार्वजनिक वाचनालयाचा सदस्य आहे. तिथल्या एका ग्रंथपालांचं आडनावदेखील रत्नपारखी आहे. अनेकदा त्यांना हाक मारली की, माझं लक्ष जायचं. एकदा मनात सहज विचार आला की वाचक आणि ग्रंथपाल दोघांचं आडनाव रत्नपारखी आहे, तर किमान लेखकाचं देखील असावं.

पुढे वर्षभरातच तो योग जुळून आला आणि माझं लेखन असलेलं एक पुस्तक त्याच वाचनायलयाच्या कपाटात पाहिलं.''

**– सौरभ रत्नपारखी**

**महाराष्ट्राचे आचार्य... आचार्य अत्रे यांचे विचार, त्यांची धडाडी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेणारी ॲड.बाबूराव कानडे लिखित दोन नवीन पुस्तके**

# आचार्य अत्रे
## बारा गावचं पाणी




शब्दांची धार आणि धमाकेबाज आशयानं महाराष्ट्र निनादून सोडणाऱ्या आचार्य अत्रेंची प्रवास...

# काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र






एक पक्ष आणि त्याचे अनेकानेक प्रवाह... घडल्या-बिघडल्या राजकारणाचा सखोल आढावा...

**किंमत प्रत्येकी : २२०/-रु. । पोस्टेज ५०/- रु**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तक परिचय

TBC-28 Book No. 6

**एक हत्यासत्र अमेरिका आणि इंग्लंडसारख्या बलाढ्य देशांना हादरवून टाकते... या हत्यासत्राच्या मुळाशी असलेल्या दहशतवादाचा मुकाबला करणाऱ्या ट्रॅकरची चित्तथरारक कहाणी**




# द किल लिस्ट

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**फ्रेडरिक फोरसाइथ**

अनुवाद

**बाळ भागवत**

## दहशतवादाच्या विरोधात एका अधिकाऱ्याने केलेला थरारक संघर्ष

दहशतवादाची समस्या जगातल्या महत्त्वाच्या देशांना भेडसावताना दिसते. अमेरिकेत दहशतवादानं थैमान घातलेलं असतानाच इंग्लंडमध्येही ते थैमान सुरू होतं आणि मग इंटरनेटवरून एक बुरखाधारी इस्लामी पाश्चात्त्य जगाविरोधात अतिविखारी भाषणं देताना, प्रचार करताना आणि पाश्चात्त्यांच्या हत्येचं आवाहन करताना आढळतो. त्याला टोपण नाव दिलं जातं 'द प्रीचर.' त्याच्या शोधाची जबाबदारी एका अधिकाऱ्याकडे सुपूर्द केली जाते. त्या प्रीचरपर्यंत हा अधिकारी कसा पोहोचतो आणि त्या शोधादरम्यान या दहशतवादाशी संबंधित घटनांची आणि व्यक्तींची संगती कशी लागत जाते, याचं थरारक चित्रण म्हणजे 'द किल लिस्ट' ही कादंबरी. फ्रेडरिक फोरसाइथ यांच्या सिद्धहस्त लेखणीतून ही कादंबरी उतरली आहे. अनुवाद केला आहे बाळ भागवत यांनी.


प्रीचर त्याचे हे उद्योग विनापत्त्याच्या वेबसाईटवरून करत असतो. त्यामुळे प्रीचरपर्यंत पोहोचणं हे त्याचा माग घेणाऱ्यासाठी-ट्रॅकरसाठी एक आव्हान असतं. दहशतवाद्यांच्या जगातील कोणी सुपरब्रेन ती वेबसाईट हाताळत असतो. मग ट्रॅकरही स्वत:च्या शोधकार्यासाठी असाच एक संगणक सुपरब्रेन शोधून काढतो आणि त्याला प्रीचरपर्यंत पोहोचायला सांगतो. दरम्यान, ट्रॅकर पाकिस्तानी आयएसआयमध्ये राहून अमेरिकेसाठी हेरगिरी करणाऱ्याला गाठतो. तिथून दुबई, इंग्लंड आणि मग पुन्हा अमेरिका असा त्याचा प्रवास होतो. या प्रवासातून कोणाला शोधायला हवं, याचा साधारण अंदाज त्याला येतो. तो अमेरिकेत परत येईपर्यंत त्या मुलाने त्या वेबसाईटचा पत्ता शोधलेला असतो. सोमालिया देशातील मोगदिशूमधल्या एका गोदामातून इंटरनेट संदेशांची अनाकलनीय देवाण-घेवाण सुरू असल्याचं तो मुलगा निदर्शनास आणून देतो. मग चार शक्तिशाली हेलिकॉप्टर्स या गोदामाच्या शोधासाठी पाठवली जातात. एक स्वीडिश जहाजही या सगळ्या घडामोडींशी संबंधित असतं. एकूणच वरवर भिन्न वाटणाऱ्या या घटनांचा एकमेकींशी काय संबंध आहे, ट्रॅकरला या घटनांमधील संबंध कसे कळत जातात, यातील नाट्य अनुभवण्यासाठी 'द किल लिस्ट' अवश्य वाचलं पाहिजे. दहशतवादाच्या रुंदावलेल्या कक्षा, त्याची पाळंमुळं खणून काढण्याचं आव्हानात्मक आणि धाडसी काम, आधुनिक तंत्रज्ञानाचा दहशतवाद्यांकडून होत असलेला गैरवापर आणि या अनुषंगाने येणाऱ्या अनेक बाबींवर 'द किल लिस्ट' ही कादंबरी प्रकाश टाकते.

◆

पुस्तकपरिचय

TBC-29 Book No. 1

शब्दांचा जादुगार ॲलिस्टर मॅकलिनच्या
कुंचल्यातून साकारलेली...
मृत्यूचा अविरत सामना करत सागरी
आव्हानांशी दोन हात करणाऱ्या दुसऱ्या महायुद्धातील
सैनिकांची शौर्यगाथा...







(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

## ॲलिस्टर मॅक्लीन

अनुवाद

**अनिल काळे**

## दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवरील संघर्षमय कादंबरी

ॲलिस्टर मॅक्लीन हे इंग्रजीतील प्रतिभावंत कादंबरीकार. १९४१ मध्ये वयाच्या १८व्या वर्षी, त्यांनी रॉयल नेव्हीत प्रवेश केला. अडीच वर्षे ते एका क्रूझरवरून हिंडत होते. आरमारी युद्धात भाग घेत होते. त्यांच्या याच अनुभवाचा पार्श्वभूमी म्हणून वापर करून त्यांनी 'एचएमएस युलिसिस' ही कादंबरी लिहिली. ही त्यांची पहिली कादंबरी. आरमारी युद्धावर आधारित असलेली ही कादंबरी इंग्रजी साहित्यात अजरामर ठरली. या कादंबरीचा मराठीत अनुवाद केला आहे अनिल काळे यांनी.

ही कहाणी साधारण सन १९४३ मधील आहे. एचएमएस युलिसिस ही ब्रिटिश आरमारातील एक क्रूझर जातीची युद्धनौका. रशियाचे जर्मनीशी युद्ध सुरू असते आणि एफआर ७७ या मालवाहू आणि तेलवाहू जहाजांच्या ताफ्यामार्फत रशियाला जर्मनीशी लढण्यासाठी अत्यंत निकड असलेले विमाने, इंधन, दारूगोळा इत्यादी युद्धसाहित्य पोचवण्याची योजना असते. युलिसिस ही या ताफ्याची फ्लॅगशिप असते आणि ताफ्याला संरक्षण पुरवण्यासाठी तिच्या साथीला आणखी काही क्रूझर, डिस्ट्रॉयर आणि विमानवाहू जहाजे देण्यात आलेली असतात. सर्व मिळून एकूण छत्तीस जहाजे या ताफ्यात असतात.


आर्क्टिक महासागरातील अति थंड हवामानाला, प्रचंड वादळे, बर्फवृष्टी, आणि अर्थातच जर्मन बॉम्बर विमाने, यू-बोटी आणि युद्धनौकांच्या हल्ल्यांना तोंड देत ही कामगिरी पार पाडणे भाग असते. स्कॉटलंडच्या उत्तरेकडील स्कापा फ्लो येथून निघून त्यांना आर्क्टिक महासागरातील मुरमान्स्क हे रशियातील बंदर गाठायचे असते. या मोहिमेपूर्वीही सतत बऱ्याच काही महिन्यांपासून युलिसिस आर्क्टिक महासागरात अशा मोहिमा करत असल्यामुळे तिच्यावरील सर्व नौसैनिक, अधिकारी वगैरे लोकांची प्रचंड उपासमार झालेली असते, थकवा आलेला असतो, धड झोप मिळालेली नसते आणि त्यामुळे युलिसिसवर एक छोटेसे बंड झालेले असते.

अशा या पार्श्वभूमीवर या ताफ्याचा प्रवास स्कापा फ्लो येथून सुरू होतो. भयंकर थंडी, बर्फवृष्टी, प्रचंड वादळे, चिडलेले व निराश झालेले नौसैनिक, त्यांची झालेली प्रचंड उपासमार, थकवा, झोपेचा अभाव, आणि ताफ्याने रशियापर्यंत पोचता कामा नये यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणारी जर्मन बॉम्बर


विमाने, युद्धनौका आणि यू-बोटी, अशा वातावरणातील या ताफ्याच्या आणि पर्यायाने युलिसिसच्या प्रवासाची ही कहाणी आहे. या सगळ्या विपरीत परिस्थितीला युलिसिसवरील सगळे अधिकारी आणि नौसैनिक ज्या असीम धैर्याने आणि शौर्याने तोंड देतात त्याचं भेदक वर्णन या कादंबरीत आहे.

ॲलिस्टर मॅक्लीन यांची ही पहिलीच कादंबरी स्फूर्तिदायक आहे. त्यातील संघर्ष वाचताना अंगावर शहारे येतात. अनिल काळे यांचा अनुवाद उत्तम.


◆




खट्याळ, अल्लड, पण महाअवलिया टॉम सॉयर आणि हक फिनची शेकडो वर्षं वाचकांना खिळवून ठेवणारी बेस्ट सेलर्स साहसं युवा लेखक अवधूत डोंगरे यांच्या शब्दांत आता मराठीत... मार्क ट्वेनच्या तिरपागड्या लेखणीचा अफलातून अभिजात आविष्कार...




किंमत : ३९५/-रु.




किंमत : ३२०/-रु.



"मला वाटते मुलांसाठी गोष्ट लिहिण्याचा सर्वांत योग्य मार्ग म्हणजे ती तत्काळ लिहायला घ्यावी; कारण ती फक्त मुलांना आकर्षित करत नाही, तर कधीकाळी मुलगा असणाऱ्या पुरुषांनाही आकर्षित करते."


**– मार्क ट्वेन**

अ भि प्रा य

# बेंजामिन फ्रँकलिन

## एक आत्मचरित्र

### फ्रँकलिन समजून घेण्यासाठी...





मानवी आयुष्य सुखावह करण्यासाठी आवश्यक असणारे शक्य तितके सारे काही एकाच आयुष्यात साध्य करणारे बेंजामिन फ्रँकलिन हे एक जगप्रसिद्ध असं प्रतिभावंत व्यक्तिमत्त्व. अमेरिकेत सार्वजनिक क्षेत्रातील अग्निशमन दल, पोलीस यंत्रणा, सार्वजनिक ग्रंथालये अशा यंत्रणांपासून अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी महत्त्वाचं योगदान दिलेलं आहे. खरं तर बेंजामिन यांचा जन्म एका गरीब कुटुंबातला. दारिद्र्याशी झगडत, पडेल ती कामं करत ते जीवन कंठत होते. मात्र या परिस्थितीपासून जगातील एक प्रभावशाली व्यक्ती बनेपर्यंतचा त्यांचा प्रवास खडतर होता. अनेक नाट्यमय

वळणं त्यात आली. मात्र त्यामुळे बेंजामिन यांची जीवनदृष्टी अधिक प्रगल्भ होत गेली. वयाच्या बाराव्या वर्षापासून मुद्रक असलेल्या भावाच्या व्यवसायात मदत करताना त्यांनी जो अनुभव कमावला, त्यामुळेच पुढे ते मुद्रण व्यवसायातही यशाची भरारी मारू शकले. 'नाही रे' पासून 'आहे रे' पर्यंतचा त्याचा हा प्रवास समजून घेण्यासाठी 'बेंजामिन फ्रँकलिन' हे आत्मचरित्र उपयुक्त आहे. सई साने यांनी या पुस्तकाचा अनुवाद केला आहे.

**दैनिक लोकसत्ता,**
**१-१२-२०१९**


# दिव्यगुणी

**प्रेरणादायी कथांचे पुष्प...**



जेव्हा कधी आपल्याभोवती कुणी अंध, अपंग या प्रकारची व्यक्ती नजरेस पडते तेव्हा नकळत मनाला वाईट वाटून जाते. तसेच सहानुभूतीनंतर हळूहळू  सूर नकारात्मक टीकेकडे झुकू लागतात. जणू काही त्या जीवाने दिव्यांग स्वरूपात जन्माला येत अपराधच केला. किती सहजतेने त्यांच्या आयुष्यातील वैविध्यता, आनंदालाच दुर्लक्षित करतो. त्यातून त्या सर्व घटकांना इतरांपेक्षा वेगळे समजत बाजूला ढकलले जाते; पण काही दिव्यांग व्यक्तींनी प्रत्येक क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी करीत यशाची उत्तुंग भरारी घेतली आहे. अशाच काही प्रेरणादायी, जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलविणाऱ्या काही यशोगाथा एकाच पुस्तकात वाचायला मिळाल्या तर किती छान होईल. दिव्यागुणी पुस्तक याच कारणाने त्याचे अनोखेपण जपते.

**दै. लोकमत,**
**१७-११-१९**




*२८, २९ डिसेंबर रोजी चिपळूण येथे दुसरे लेखक-प्रकाशक संमेलन पार पडले. या संमेलनाचे अध्यक्षपद मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक श्री. अनिल मेहता यांनी भूषविले. त्यांच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी मराठीतील प्रकाशन व्यवसायाचा समग्र आढावा घेतला.*

# संमेलन अध्यक्षांचे भाषण

आदरणीय व्यासपीठ आणि समोर बसलेले ज्येष्ठ जाणते, तरुण उत्साही प्रकाशक, प्रकाशन व्यवसायाचा आधारबिंदू असणारे लेखक, वाचक आणि साहित्य क्षेत्रातील सर्व घटक, उपस्थित रसिक हो...

कोकणच्या आरसपानी सौंदर्याचा आरसा म्हणजे चिपळूण. महाराष्ट्रातील प्रकाशन व्यवसायाच्या प्रगतीचा आणि त्याच्या भविष्याचा धांडोळा घेण्यासाठी आपल्याला ही निसर्गरम्य आणि शांत जागा लाभली हे आपलं भाग्यच आहे. त्यासाठी चिपळूणकरांचे आभार!

माझ्या भाषणाला सुरुवात करण्यापूर्वी मराठीच्या रक्षणाचा मुद्दा घेऊन सत्तेत आलेल्या नव्या सरकारचं अभिनंदन करायचं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या नात्यानं उद्धवजी ठाकरे मराठीच्या संवर्धनासाठी आणि भाषेच्या संवर्धनात मोलाची कामगिरी बजावणाऱ्या प्रकाशन व्यवसायासाठी विशेष प्रयत्न करतील, अशी मी आशा बाळगतो.

आज सर्वप्रथम मला महाराष्ट्राचे लाडके लेखक आनंद यादव यांचं स्मरण करावंसं वाटतं. माझ्यातली पुस्तकांची ओढ आणि व्यवसायाचं कसब सर्वप्रथम त्यांनी ओळखलं आणि मला प्रकाशन व्यवसायात उतरण्याचा सल्ला देत स्वतःचं पुस्तक छापायलं दिलं. त्या काळी त्यांनी आणि रणजित देसाई, विश्वास पाटील यांच्यासारख्या दिग्गज लेखकांनी माझ्यावर दाखविलेल्या विश्वासामुळेच आज मी या जागी उभा आहे, असं मला वाटतं.

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ आणि लोकमान्य टिळक वाचनालयानं एकमतानं माझी या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड केली. त्यांनी दाखवलेला विश्वास आणि माझ्याकडून असलेल्या अपेक्षांचं भान... आज आपणासमोर उभं राहताना आणखी तीव्रपणे जाणवत आहे. या प्रसंगी मराठी प्रकाशन व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या पूर्वसुरींची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. जर्मनीत पंधराव्या शतकाच्या मध्यावर जोहान गुटेनबर्गने मुद्रणकलेचा शोध लावला. आणि ही कला मराठी मातीत पोहोचायला सुमारे शंभर वर्षं लागली. १६१० साली फादर स्टीफन यांनी रोमन मराठी लिपीत लिहिलेलं 'ख्रिस्तपुराण' प्रकाशित केलं. मुद्रणकलेचा प्राथमिक वापर ख्रिश्चन धर्मप्रसारासाठी असल्याने छापील पुस्तकांबद्दल तत्कालीन मराठी जनतेच्या मनात एक अढी होती; पण कालांतराने पुस्तकांची व्यापकता वाढत गेली तसा

प्रकाशन व्यवसाय मूळ धरत गेला. स्वातंत्र्यपूर्व काळात न्यायमूर्ती रानडे आणि लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख) यांच्या प्रेरणेतून महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेने मराठी ग्रंथांच्या प्रकाशनाला चालना दिली. तर स्वातंत्र्योत्तर काळात अनेक दिग्गजांनी या परंपरेचा वारसा चालवला. मराठी मुद्रणक्रांतीचे अग्रदूत म्हणता येतील असे गणपत कृष्णाजी, जावजी दादाजी, दामोदर यंदे, आ.रा.सावंत यांच्यासारख्या धुरीणांनी काळाची पावलं ओळखली आणि प्रकाशन व्यवसायाच्या प्रगतीला हातभार लावला. आ.रा.सावंत यांचं तर अवघं प्राथमिक शिक्षण झालेलं असताना त्यांनी भाषेच्या सेवेचं व्रत अंगीकारलं. ही परंपरा पुढे मराठीतील दुसऱ्या-तिसऱ्या फळीतील प्रकाशकांनी समर्थपणे पुढे नेली. ज्यात केशव भिकाजी ढवळे, श्री. पु. भागवत, मधुकाका, अनंतराव कुलकर्णी, केशवराव कोठावळे, रा.ज.देशमुख, रामदास भटकळ, ह.वी.मोटे, वा.वि.भट यांचं मोलाचं योगदान लाभलं. तसंच त्या काळातील मुद्रक अण्णा लाटकर आणि मौज प्रेसचे भागवत यांच्यामुळं एका अर्थी मराठी मुद्रण व्यवसायात क्रांती झाली. प्रकाशन व्यवसायातील महत्त्वाचे घटक म्हणून कृष्णा करवार, धायगुडे, मोहन वेल्हाळ यांच्यासारखे अनेक संपादक व मुद्रितशोधक आणि दीनानाथ दलाल, सुभाष अवचट, पद्मा सहस्रबुद्धे, चंद्रमोहन कुलकर्णी यांच्यासारखे चित्रकार अशा अनेक व्यक्तींनी ग्रंथनिर्मिती क्षेत्रात महत्त्वाचं योगदान दिलं.

या पूर्वसुरींनी तयार केलेल्या हमरस्त्यावरच आपण सर्व आज मार्गक्रमण करत आहोत. मराठीतील प्रकाशन व्यवसाय प्रारंभीच्या काळात मुंबईत एकवटला होता; पण १९३० नंतर तो पुण्यात स्थलांतरित होत गेला. आजही मराठीतील ७० टक्के प्रकाशन व्यवसाय पुण्यात आहे; पण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील छोटे-मोठे प्रकाशक आपापल्या परीने या व्यवसायाला हातभार लावत आहेत. त्यामुळे आजच्या काळात चांदा ते बांदा मराठी प्रकाशक आढळून येतात, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. (उदाहरणच द्यायचं झालं तर नवनाथ गोरेंसारख्या युवा साहित्यिकाला एका छोट्या प्रकाशकानं प्रोत्साहन दिलं आणि त्यांच्या 'फेसाटी' कादंबरीने साहित्य अकादमी पुरस्कारावर मोहोर उमटवली. त्यामुळं एखाद्याच्या व्यवसायाचा आवाका कमी-जास्त असला तरी कुठलाही प्रकाशक लहान नसतो, असं मला वाटतं.) एकीकडे प्रकाशन व्यवसायाला घरघर लागल्याचा आणि वाचनसंस्कृती लोप पावत चालल्याचा घोष होत असताना या छोट्या प्रकाशकांनी दाखविलेलं धाडस मला

कौतुकास्पद वाटतं. आणि वाचन संस्कृतीला मरण नाही, हा विश्वासही त्यातून दृढ होतो.

प्रकाशन व्यवसाय हा एखादा संदेश बाटलीत भरून ती बाटली बंद करून समुद्रात भिरकावण्यासारखा असतो. ती बाटली कुठल्या किनाऱ्याला लागेल... केव्हा लागेल... कुणाच्या हाती पडेल आणि हाती पडल्यावर समोरचा त्याचं कसं स्वागत करेल... त्यातून काय अर्थ काढेल, याची काही शाश्वती नसते; पण तरीही आपल्यातील प्रत्येक जण अशी बाटली समुद्रात भिरकावण्याचं धाडस करतो. मी तर असं म्हणेन की, ती बाटली योग्य जागी पोहोचावी म्हणून त्या बाटलीसह आपण स्वत: त्या समुद्रात उडी घ्यायला सज्ज असतो.

प्रकाशन व्यवसायाचं आजचं स्वरूप पाहता आव्हानांचा समुद्र आपल्या समोर आहे; पण त्याचबरोबर संधीच्या बारमाही नद्याही आजूबाजूला वाहत आहेत, त्याकडे मला आपलं लक्ष वेधायचं आहे. प्रसिद्ध शायर जिगर मुरादाबादी यांनी सर्वांना एक सल्ला दिला आहे. ते म्हणतात,

*किधर से बर्क चमकती है, देखे ए वाइज*
*मै अपना जाम उठाता हूँ, तू किताब उठा।*

याचा अर्थ असा आहे, हे सल्ला देणाऱ्या माणसा, कुठून वीज चमकते ते पाहू चल, मी माझा दारूचा प्याला उचलतो, तू पुस्तक उचलून पाहा.

मुरादाबादी जरी असं म्हणत असले तरी मला वाटतं, सामाजिक जीवनात संस्कृतीचा प्रकाश उजळवायचा असेल तर आपल्याला पुस्तकांचीच सोबत धरायला हवी. आज शेकडो संधी आपल्या दाराशी लोळण घेत आहेत. पुस्तकांच्या छपाईकडेच पाहा. वीसेक वर्षांपूर्वीपर्यंत Off set प्रिंटिंगसाठी आपल्याला मोठी गुंतवणूक करावी लागत होती. एका वेळी किमान हजाराची आवृत्ती छापावी लागायची; पण आज POD सारख्या तंत्रज्ञानामुळे आपण आपल्याला हव्या तेवढ्याच प्रती छापून घेऊ शकतो. त्यामुळं आपली गुंतवणूकही मर्यादित राहते. पुस्तकांचा दर्जा टिकून राहतो. पुस्तकांसाठी मोठ्या कोठारांची गरज राहत नाही, त्यामुळे जागेची समस्याही उद्भवत नाही. त्यामुळे POD तंत्रज्ञान प्रकाशन व्यवसायातली मोठी क्रांती आहे, असं मला वाटतं.

पुस्तक मांडणीच्या दृष्टीनेही आज इंटरनेटवर लाखो संदर्भ उपलब्ध असतात. जगाच्या कानाकोपऱ्यातला कोणताही आर्टिस्ट तुम्हाला मुखपृष्ठ,

ले-आऊट आणि इतर मांडणी करून देऊ शकतो. तुमच्याकडे योग्य भांडवल असल्यास तुम्ही तुमच्या कार्यालयात अशा गुणी लोकांची नियुक्ती करू शकता. प्रकाशन व्यवसायाचा गाभा असणारा कन्टेन्ट अर्थात मजकूर निर्माण करण्यासाठीही आज अशाच संधी उपलब्ध आहेत. सोशल मीडियासारख्या माध्यमाने आज नव्या लेखकांना मुक्त व्यासपीठ मिळवून दिलं आहे. त्यातून लेखनाचं कसब असणारे लेखक शोधता येऊ शकतात आणि त्यांना पुस्तक निर्मितीसाठीही लिहितं करता येऊ शकतं. त्यातूनच लेखक-प्रकाशक संबंधांनाही नवा आयाम मिळू शकतो. चांगला कन्टेन्ट हा प्रकाशन व्यवसायाचा गाभा असतो. त्यामुळं कन्टेन्ट निर्माण करण्यासाठी लेखक शोधणं आणि त्या लेखकाला प्रस्थापित करण्याची जबाबदारी प्रकाशकांनी घ्यायला हवी; कारण एखाद्या लेखकाची पुस्तकं कोणत्या प्रकाशकाने प्रकाशित केली आहेत, यावरूनही त्या प्रकाशकाची ओळख निर्माण होऊ शकते. त्या अनुषंगाने एखाद्या विशिष्ट साहित्यप्रकारात आपल वर्चस्व सिद्ध करणंही शक्य आहे. वाचकांची रुची जाणून काळाची पावलं ओळखायला हवीत. आपल्या लेखनाला योग्य न्याय देणारा प्रकाशक मिळाला की आपोआपच त्या लेखकाचं प्रकाशकाबरोबर मैत्र जुळतं. आणि लेखक-प्रकाशकातले असे मैत्रिपूर्ण संबंधच प्रकाशन व्यवसायाला बळकटी देण्यासाठी गरजेचे असतात. असे संबंध प्रस्थापित करण्यासाठी लेखकाला द्यायच्या मानधनाबाबतही प्रकाशक सजग असायला हवा. मी एका इंजिनिअरचा विनोद ऐकला होता. मरिन इंजिन बनवणाऱ्या एका इंजिनिअरला एका नावाड्यानं लिहिलं, की तुझं इंजिन पाठवून दे, ते योग्य वाटलं तर मी चेक पाठवून देईन... त्यावर त्या इंजिनिअरनं त्या नावाड्याला पुन्हा उत्तर पाठवलं, ‘तुझा चेक पाठवून दे, तो योग्य असेल तर मी इंजिन पाठवेन.’ म्हणूनच मला वाटतं लेखक-प्रकाशकांनी एकमेकांबरोबर व्यवहार करताना एकमेकांचा आब ठेवायला हवा.

स्वतंत्र लेखनाबरोबरच अनुवादाचं क्षेत्रही विस्तारण्याच्या संधी आज वाढल्या आहेत. जगभरचे प्रकाशक भारतीय बाजारपेठेकडे आकर्षित होताना दिसतात. भारतीय भाषांमध्ये आपली पुस्तकं अनुवादित व्हावीत, यासाठी ते स्थानिक प्रकाशकांच्या शोधातही असतात; पण अशा जागतिक प्रकाशकांशी संवाद साधण्यात आपण अपुरे पडतो. फ्रँकफर्टसारखं भव्य जागतिक दालन आज उपलब्ध आहे; पण तिथला आपला सहभाग नगण्य आहे. यात खर्चाचा मुद्दा आहे, हे मान्य आहे; पण आजची मराठी प्रकाशन व्यवसायाची व्याप्ती

पाहता एखाद्या वर्षी तरी मराठी प्रकाशकांनी अशा आंतरराष्ट्रीय बुकफेअरना उपस्थिती लावायला हरकत नसावी. आणि अगदी खर्चाअभावी प्रत्यक्ष सहभाग शक्य नसला तरी ई-मेल आणि इतर डिजिटल माध्यमांच्या वापराने आपण संपर्क वाढवू शकतो. फक्त त्यांची पुस्तकं आपल्या भाषेत अनुवादित करण्यापेक्षा आपलीही पुस्तकं त्यांच्यापर्यंत पोहोचवता येतात का, यासाठीही आपण प्रयत्न करायला हवेत. १९९९ साली मी 'फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स' यांच्याबरोबर एक बहुभाषिक संमेलन घेतलं होतं. त्या संमेलनाला देशभरातील लेखक-प्रकाशकांनी उपस्थिती लावली आणि संवाद साधला. अशी संमेलनं आजच्या काळाची गरज आहे. अशा संमेलनांनंतर इतर भाषांतील संबंधितांशी संपर्क ठेवून सतत पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. अनुवादाच्या माध्यमातून जगभरचं साहित्य आपल्याकडे येत असताना आपण देशांतर्गत साहित्यातील आदान-प्रदान वाढविण्यासाठी आणि आपल्या लेखकांना आपल्या भाषेच्या बाहेरची साहित्यक्षेत्रं उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

नव्या मजकुरावर काम करताना आपल्याकडे असणाऱ्या जुन्या पुस्तकांवरही नव्याने विचार होणं गरजेचं आहे. जुन्या पुस्तकांच्या आवृत्त्या काढताना आपण त्यांची नव्या वाचकांच्या दृष्टिकोनातून मांडणी करायला हवी. काळानुरूप कागदाच्या स्वरूपापासून वाचकाच्या मानसिकतेपर्यंत गोष्टी बदलत जातात. त्यामुळं समकालीन प्रवाहांचा विचार मनात कायम ठेवायला हवा. आज पेंग्विनसारखे अनेक इंग्रजी प्रकाशक जुन्या अभिजात साहित्याच्या abridged आवृत्त्या काढताना दिसतात. त्यांची मांडणीही नव्याने केलेली असते. हे करताना आत्ताच्या वाचकांकडे असलेला वेळ, त्यांच्या वाचनाच्या आवडीनिवडी आणि प्राथमिकता अशाच अनेक बाबींचा विचार ते करतात, तोच आपणही करायला हवा. किंवा कुणाचं अनुकरण करण्याऐवजी आपणच नवीन संकल्पनाही राबवायला हव्यात.

पुस्तकाचा मजकूर, त्याची मांडणी आणि निर्मितिप्रक्रियेचा विचार करत असताना पुस्तकांच्या माध्यमांवरही प्रकाश टाकायला हवा. पारंपरिक दृष्टिकोन असणाऱ्या प्रकाशकांना ई-बुक, ऑडिओ बुक आणि इतर ई-माध्यमं आव्हानांसारखी वाटतात; पण मुद्रित ग्रंथांव्यतिरिक्त इतर माध्यमांना संकट म्हणून न बघता संधी म्हणून पाहायला हवं. निव्वळ छापील पुस्तकांवर अवलंबून राहण्याचा काळ मागे पडला आहे. त्यामुळे प्रकाशकांनी छापील

पुस्तकांबरोबरच डिजिटल पुस्तकांसाठीही स्वागतशील असायला हवं. छापील पुस्तकं परंपरागत राजमार्ग नक्कीच आहे. पुस्तकांचा स्पर्श, त्यांचा गंध यांच्याशी आपलं नातं जुळलेलं असतं; पण डिजिटल पुस्तकांची स्वतंत्र अशी वैशिष्ट्यं आहेत. यातली गुंतवणूक तुलनेने कमी आहे. छपाईच्या खर्चातली कपात आणि कायमस्वरूपी उत्पादन ही त्यातली प्रमुख वैशिष्ट्यं आहेतच; पण वाचकांना ती जवळ बाळगायलाही सुलभ आहेत. कल्पना करून पाहा, आपल्या पाच-बाय अडीच सेंटिमीटरच्या खिशात बसणाऱ्या एका मोबाइलमध्ये आपण अक्षरश: शेकडो पुस्तकं बाळगू शकतो. तेवढी पुस्तकं सोबत बाळगणं सोडाच, घरी ठेवायलाही आपल्या वन बीएचके आणि टू बीएचकेमध्ये पुरेशी जागा नाही. यापलीकडेही जाऊन विचार करायचा झाल्यास पुस्तकनिर्मितीत लागणाऱ्या कागदासाठी जी वृक्षतोड होते आणि पर्यावरणाचा ऱ्हास होतो, त्यासाठीही आपल्याला डिजिटल पुस्तकांचा विचार करायला हवा. ग्रेटा थनबर्ग ही शालेय चिमुरडी पर्यावरण रक्षणासाठी आंदोलन करत आहे. तिचं पुस्तक प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरेल; पण ते पुस्तक छापील स्वरूपात काढणं म्हणजे उपहासात्मक ठरेल. छापील पुस्तकांना मरण नाहीच; पण नव्या माध्यमांच्या वापरातून आपलं मन सुसंस्कृत करणं प्रत्येकाची गरज आहे. म्हणून पुन्हा सांगेन, डिजिटल पुस्तकं संकट नसून संधी आहे, असं माना.

प्रकाशक आणि विक्रेता या दोन्ही भूमिका मी माझ्या आयुष्यात बजावल्या आहेत. पुस्तकांच्या विक्रीवरच प्रकाशन व्यवसायाचं भवितव्य अवलंबून आहे. त्यामुळे पुस्तक विक्रीच्या नव्या वाटांबद्दलही मी बोलू इच्छितो. जुन्या काळी वितरक हा एकमेव दुवा होता. ज्यात आयडियलचे कांता शेठ, Bombay Book Depo चे कुमठा शेठ, साहित्य प्रसार केंद्र, नागपूरचे राजाभाऊ कुलकर्णी आणि महाराष्ट्रभरातील अनेक वितरकांनी पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवण्याची धुरा सांभाळली. धनंजय ढवळेंसारख्या वितरकांनी ग्रंथ प्रदर्शनांना नवा आयाम दिला आणि सर्वदूर पुस्तकं पोहोचवण्याचं काम केलं. या ग्रंथ प्रदर्शनांनीही एक मोठा काळ पुस्तक वितरणाची धुरा सांभाळली; पण आता नव्या माध्यमांमुळे वितरकांची मक्तेदारी मोडीत निघण्याची शक्यता आहे. ऑस्ट्रेलिया आणि युकेसारख्या देशांमध्ये अनेक बुक स्टोअर्स बंद पडली आहेत. Amazon, Flipkart सारख्या Online विक्रेत्यांबरोबरच स्वत:ची वेबसाइट, फेसबुक पेज, इन्स्टाग्राम, व्हॉट्स ॲप सारख्या माध्यमातून पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवणं सहजसाध्य झालं आहे. या नव्या माध्यमांसाठी आपण

किती सज्ज आहोत, याचं आत्मपरीक्षण प्रत्येक प्रकाशकाने करायला हवं. आज सोशल मीडियावर जाहिरातींची सोय उपलब्ध आहे. त्यातही फक्त तुम्हाला अपेक्षित असलेल्या भूभागातील ग्राहकांपर्यंत पुस्तकांची जाहिरात पोहोचवता येते. ती जाहिरात किती जणांनी पाहिली, त्यावर येणाऱ्या प्रतिक्रिया यांचे अपडेट्स ही माध्यमं आपल्याला देतात; पण आजही मराठी प्रकाशकांकडून त्याचा पुरेसा वापर होताना दिसत नाही. नव्या माध्यमांचा विचार करून आपल्या विक्री साहित्यामध्ये कल्पकता आणायला हवी. केवळ वर्तमानपत्रातल्या जाहिरातींपेक्षा हल्ली एखादी फेसबुक पोस्ट किंवा एखादा कल्पक व्हिडिओ वाचकांचं अधिक लक्ष वेधू शकतो; पण त्यासाठी तसा सकारात्मक दृष्टिकोन प्रकाशकांनी बाळगायला हवा. आज अनेक वाचक स्वत:हून सोशल मीडियावर वाचकांचे ग्रुप बनवत आहेत, अशा ग्रुप्सशी आपला संपर्क असायला हवा.

पुस्तक प्रसिद्धीच्या साहित्याविषयीच बोलायचं झालं तर प्रत्येक प्रकाशकाकडे ग्रंथसूची असते ती वेळोवेळी अद्ययावत करायला हवी. ती वितरक आणि ग्राहकांना कुठल्याही क्षणी कोणत्याही ठिकाणी उपलब्ध व्हावी, यासाठी ती आपल्या वेबसाइटवर उपलब्ध असायलाच हवी आणि वेबसाइटही सतत अद्ययावत राखायला हवी. वितरकांना अपेक्षित असणाऱ्या गोष्टींसाठी वेगळी सूची, तर वाचक वर्गाची रुची लक्षात घेऊन विशेष सूचीची मांडणी करायला हवी. पुस्तकांची माहिती वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी इन-हाऊस मॅगझिन महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्यामुळं आपली नवी पुस्तकं, त्यांची परीक्षणं अशी अद्ययावत माहिती अंकांमध्ये यायला हवी. छोट्या प्रकाशकांना स्वतंत्र मासिक काढणं शक्य नसेल तर ते दुसऱ्या प्रकाशकांच्या मासिकामध्येही आपल्या पुस्तकांच्या जाहिराती देऊ शकतात. खंर तर मला संघाला असं सुचवावंसं वाटतं की संघाने स्वत:चं असं मासिक काढायला हवं, ज्यामुळे सर्व प्रकाशकांना पुस्तक प्रसारासाठी एक हक्काचं व्यासपीठ मिळेल. NEW YORK TIMES REVIEW, ALL ABOUT PUBLISHING आणि लंडनमधील THE BOOK SELLERS (ज्यांचं वार्षिक सदस्य शुल्क वीस हजार आहे.) यासारखं एखादं मासिक संघाने स्वत: सुरू करावं, असं मला सुचवावंसं वाटतं.

वाचकांचा प्रतिसाद मिळत नाही म्हणून हल्ली पुस्तक प्रकाशन सोहळ्यांचं प्रमाणही कमी होऊ लागलं आहे; पण यासाठीही कल्पक योजनांची गरज आहे.

पुस्तकाचा विषय लक्षात घेऊन त्याच्याशी संबंधित सामाजिक घटकांबरोबर असे कार्यक्रम आखणं उपयुक्त ठरू शकतं. वाचक हा प्रकाशन व्यवसायाचा आधारबिंदू आहे. आपल्या व्यवसायाचा विचार करत असताना वाचक केंद्रस्थानी असायला हवा. त्यासाठी वाचक घडवण्याचीही आपल्यावर जबाबदारी आहे. यासाठी अनेक उपक्रम राबवता येऊ शकतात. चांगल्या वाचकांना पुरस्कार दिल्यास त्यांच्यात वाचनाची गोडी आणखी वाढू शकते. वाचकांबरोबरचा संवाद वाढवण्यासाठी वाचनकट्ट्यांचं आयोजन शक्य आहे. अशा वाचनकट्ट्यांना कदाचित काही वेळा उपस्थिती कमी लाभण्याची शक्यता आहे; पण त्यातून एखादा जरी नवा वाचक आपण निर्माण करू शकलो, तरी ते आवश्यक आहे. मुख्यत: लहान मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी काय करता येईल, याचा आपण विचार करायला हवा. आज मोठ्या प्रमाणात मुलांच्या हातामध्ये मोबाइल आढळून येतात. त्याचा वापर अगदी प्राणघातक गेम खेळण्यासाठी होत आहे. त्या जागी मुलांची जडणघडण आणखी सकारात्मक करण्यासाठी त्यांना पुस्तकांकडे कसं वळवता येईल, यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत.

AIS हा सध्याचा प्रकाशन व्यवसायातील परवलीचा शब्द आहे. एआयएस म्हणजे All Information Sheet. वितरकांकडे पुस्तकं पाठविताना अशी All Information Sheet पाठविल्याने पुस्तकांची इत्थंभूत माहिती (पुस्तकाचं नाव, विषय, सारांश, किंमत इत्यादी) त्यांना मिळते आणि त्यांच्यासाठी पुस्तकांच्या order देणं सोपं होतं. त्यामुळे अशा स्वरूपाच्या AIS, पुस्तकाचे पोस्टर्स, बुकमार्क आणि पुस्तक प्रसिद्धीचं इतर साहित्य वितरकांकडे पोहोचविलं गेलं पाहिजे.

लेखक-प्रकाशक संबंध जसे महत्त्वाचे आहेत, तसेच प्रकाशक आणि विक्रेता यांच्यामधील संबंधही महत्त्वाचे आहेत. विक्रेत्याचा वाचकांशी थेट संबंध येतो. त्यामुळे वाचकांच्या प्रतिक्रिया, त्यांच्या गरजा आणि त्यांच्या अपेक्षा समजून घ्यायला विक्रेता हे उत्कृष्ट माध्यम, साधन आहे.

पुस्तक विक्रीसाठी पुस्तक प्रदर्शनं हे हक्काचं माध्यम असतं. यंदाच्या ‘कोलकाता बुक फेअर’ने बारा दिवसांत २१ कोटींची विक्री करून पुस्तक प्रदर्शनांचं महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केलं आहे. सर्वच प्रकाशक अशा प्रदर्शनात सहभाग घ्यायला उत्सुक असतात; पण प्रदर्शनात सहभाग घेताना आणि त्यात आपला Stall मांडतानाही कल्पकतेचा वापर हवा. Stall ची

मांडणी करतानाही वाचकांच्या मानसिकतेचा विचार करून करायला हवी. शिवाय आपल्याकडे उपलब्ध असलेला संपूर्ण साहित्य ठेवा प्रदर्शनात आटोपशीर मांडला जाईल, याकडे लक्ष पुरवलं जायला हवं. प्रदर्शनात दिल्या जाणाऱ्या सवलतींबाबत स्पष्टता असायला हवी. प्रदर्शनांचा विचार करताना फक्त साहित्य संमेलनांसारख्या उपलब्ध संधींचाच विचार करता कामा नये, तर वैयक्तिक पातळीवर स्वतंत्रपणेही प्रदर्शने भरवण्याचा विचार व्हायला हवा. मोठमोठ्या संस्थांमध्ये, शाळा-महाविद्यालयांमध्ये अगदी सोसायट्यांमध्येही छोटी छोटी प्रदर्शने भरवणं शक्य आहे. त्यात कदाचित विक्री कमी-जास्त होईल; पण आपली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी तरी नक्की फायदा होईल. शिवाय छोट्या-मोठ्या प्रकाशकांनी एकत्र येऊन असे प्रयोग करायलाही हरकत नाही.

छापील पुस्तक विक्री हा प्रकाशकाचा मुख्य उद्देश आणि व्यवसाय असला तरी प्रकाशकांनी या व्यवसायाची व्याप्ती वाढवण्यासाठीही प्रयत्न करायला हवेत. साहित्य क्षेत्र मनोरंजन क्षेत्राचा पाया असतो. साहित्यात आढळणाऱ्या कथानकांमध्येच एखाद्या मालिकेच्या, सिनेमाच्या शक्यताही लपलेल्या असू शकतात. ‘दुनियादारी’ किंवा अगदी अलीकडच्या काळातला ‘नाथ हा माझा’ पुस्तकावर आधारित सिनेमा पाहिला की पुस्तकांमध्ये दडलेलं कथानक सिनेमाच्या पडद्यावर किती प्रभावीपणे उतरू शकतं, याची प्रचिती येते. आपल्याकडील अशी पुस्तकं शोधून त्या दृष्टीनेही सिनेनिर्मिती संस्थांना प्रस्ताव सादर करता येऊ शकतात. याबाबतच्या व्यवहारांची स्पष्टता लेखकांबरोबरही ठेवायला हवी. पुस्तकाचे करार करताना या बाबी स्पष्ट केल्या जायला हव्यात. अनेक विदेशी प्रकाशक आणि एजन्सीज पुस्तकाचे करार करतानाच या गोष्टींचा समावेश करतात. आज मल्टिप्लेक्स, नेटफ्लिक्स सारख्या माध्यमांनी आपल्यासमोर अनेक पर्याय उपलब्ध केले आहेत. म्हणूनच विल्यम मॉरिस सारखी साहित्यिक एजन्सी चित्रपट निर्मितीतही जोरदार काम करते आहे. आपली पारंपरिक विचारसरणी थोडीशी बाजूला सारून आपण अशा पर्यायांवर विचार करण्याची वेळ आलेली आहे.

आपल्याकडील प्रकाशन व्यवसायाचं स्वरूप आजही कुटिर उद्योगासारखं आहे. ज्यात छोटेखानी व्यवसायाचं प्रमाण मोठं आहे; पण व्यवसाय छोटा असला तरी स्वत:ला एक ब्रॅण्ड म्हणून प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येक प्रकाशकानं प्रयत्न करायला हवा. एखाद्या विशिष्ट साहित्यप्रकाराचा विचार

करताना आपल्या प्रकाशनाचं नाव प्राथमिकतेनं घेतलं जाईल, अशी ओळख निर्माण करण्याचा आपला प्रयत्न असायला हवा.

लेखक-प्रकाशक संमेलनाचा अध्यक्ष म्हणून माझी भूमिका मांडताना प्रकाशकांच्या सरकारकडून असणाऱ्या अपेक्षा इथं मांडणंही गरजेचं आहे.

* सरकारकडून शासनमान्य पुस्तकांची यादी जाहीर होते; पण त्या यादीची प्रकाशकांना वाट पाहावी लागते. ही यादी सरकारने दरवर्षी अद्ययावत करायला हवी आणि त्याची माहिती प्रकाशकांकडे पोहोचवायला हवी.
* सरकारने २०१२ नंतर नव्या वाचनालयांना मान्यता दिलेली नाही, अशा परिस्थितीत वाचनसंस्कृती कशी वाढेल? मी आज शासनास आणि ग्रंथालयांचे संचालक यांना विनंती करतो की त्यांनीही प्रकाशकांना योग्य ते सहकार्य मिळेल, याकडे लक्ष पुरवावे. शासनामार्फत महाविद्यालयांना ग्रंथखरेदीसाठी अनुदान दिलं जातं. या अनुदानामार्फत घेतलेल्या पुस्तकांचा मोठा संग्रह अनेक जुन्या महाविद्यालयांकडे आहे. आणि त्याच्या देखभालीसाठी महाविद्यालयांना प्रचंड पैसा खर्च करावा लागतो, हे शासनाने लक्षातच घेतलेलं नाही. त्यामुळे कित्येक ठिकाणच्या जुन्या ग्रंथांची धुळधाण होत आहे. त्यामुळे अनुदान देताना ग्रंथालयांची क्षमता किती आहे आणि त्यांच्याकडे ग्रंथसंपदा किती आहे, याचाही धांडोळा घ्यायला हवा. जुन्या ग्रंथांचं जतन करण्यासाठी आणि त्यांच्या डिजिटायझेशनसाठीही शासनाने अनुदान द्यायला हवं. इथे मला नागपूरमधील नव्या IIM कॅम्पसचं उदाहरण द्यावंसं वाटतं. या नव्याने उभारल्या जात असणाऱ्या कॅम्पसमध्ये ग्रंथालयासाठी तुलनेने कमी जागा ठेवण्यात आली आहे. त्याचं कारण त्यांच्याकडील सर्व जर्नल्स, ग्रंथ डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत आहेत आणि त्याच्या साठवणुकीसाठी ग्रंथालयाला फार मोठ्या जागेची गरज नाही. हा ट्रेण्ड प्रकाशकांनी, ग्रंथालयांनी आणि शासनानेही लक्षात घ्यायला हवा. आणि डिजिटल ग्रंथालयांनाही प्रोत्साहन द्यायला हवं.
* राजा राममोहन राय फाउंडेशनमार्फत होणाऱ्या खरेदीतील काही अटी जाचक आहेत, त्या अटी काढून टाकाव्यात. यात प्रत्येक प्रकाशकाची फक्त दहा टायटल्स घेण्यासंदर्भातील अट आहे; पण एखादा प्रकाशक वर्षाला दोनशेच्या जवळपास पुस्तकं प्रकाशित करत असेल, तर कितीतरी चांगल्या पुस्तकांना न्याय मिळणार नाही. जी पुस्तकं ग्रंथालयांच्या

माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचली असती, ती पोहोचवता येणार नाहीत. या योजनेअंतर्गत होणाऱ्या पुस्तक खरेदीत पुस्तकाची दुसरी आवृत्ती ग्राह्य धरली जात नाही. त्यामुळेही एखाद्या चांगल्या पुस्तकाला फटका बसू शकतो, या अटीचाही शासनाने पुनर्विचार करायला हवा. एकीकडे पुस्तकांच्या किमती वाढत असताना शासनाने पुस्तक खरेदीच्या बजेटमध्ये वाढ केलेली नाही, याबाबतही विचार होणं गरजेचं आहे.

* सरकारने प्रकाशन व्यवसायावर जीएसटीच्या जाचक अटी लादल्या आहेत. त्यामुळे लेखकांच्या मानधनापासून ते छपाईच्या खर्चापर्यंत प्रत्येक गोष्टीचा खर्च वाढत जातो. आणि त्याचा परिणाम पुस्तकांच्या किंमतीवर होतो. त्यामुळे प्रकाशकांना जीएसटीमध्ये सवलत मिळायला हवी.
* ग्रंथालयांची अद्ययावत यादी प्रत्येक प्रकाशकाला मिळावी. त्यासाठी आपण योग्य ते मूल्य आकारले तरी चालेल; पण ती अद्ययावत असावी हीच इच्छा. शिवाय ग्रंथालय संचालकांनी सर्व प्रकाशकांचे ई-मेल ॲड्रेस अपडेट करून ही यादी मेलद्वारे पाठवण्याची व्यवस्थाही करायला हवी.
* पूर्वीच्या सरकारने शाळांचे वेतनेतर अनुदान बंद केले आहे, ते नव्या सरकारने पुन्हा सुरू करावे.
* शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांमध्ये इतर भाषांमधून मराठीत अनुवादित झालेल्या पुस्तकांना पुरस्कार दिला जातो; पण मराठी पुस्तकं इतर भाषांमध्ये अनुवादित होत असतील, तर अशा पुस्तकांनाही पुरस्कार अथवा अनुदान मिळायला हवं. जेणेकरून परकीय भाषांतील प्रकाशकांना मराठी पुस्तकांच्या अनुवादाकडे आकर्षित करता येईल. त्यांना प्रोत्साहन देता येईल. आणि मराठी लेखक बाहेरच्या प्रांतांतील वाचकांपर्यंत पोहोचू शकेल.
* पुस्तकांच्या पायरसीसंदर्भात सरकारला वारंवार निवेदन देऊनही याबाबत काहीच पावलं उचलली जात नाहीत. उलट डिजिटल माध्यमांमध्येही पुस्तकांची पायरसी वाढताना दिसते आहे. यासाठी वेळीच ठोस उपाययोजनांची गरज आहे.
* मराठीत आजपर्यंत प्रकाशित झालेल्या पुस्तकांची सूचीही शासनाने अद्ययावत करायला हवी. असे जुने काही संदर्भ ग्रंथ उपलब्ध असले, तरी ते पुरेसे अद्ययावत नाहीत.
* शासकीय ग्रंथोत्सव लोकसहभागी व्हायला हवा. त्यातील प्रकाशकांचा

आणि वाचकांचा सहभाग वाढायला हवा. वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये निरनिराळ्या तारखांना शासनाने ग्रंथोत्सवांचं आयोजन करायला हवं. हा ग्रंथोत्सव अवघ्या दोनेक दिवसात संपतो, तो किमान पाचेक दिवस तरी चालायला हवा. हा ग्रंथोत्सव शासनाने संघाच्या साह्याने आयोजित केल्यास तो आणखी व्यापक करता येईल.

* युवकांना, वाचकांना आकर्षित करतील अशा घोषणांचा आधार घेत वाचन चळवळ वाढवायला हवी. 'एक तरी पुस्तक प्रत्येक घरी', 'घरोघरी ग्रंथालय', 'बुके नको, पुस्तके द्या' अशा पद्धतीचा पुस्तकांचा प्रचार, प्रसार वाढायला हवा.

खरंतर अशा अनेक मागण्या ग्रंथालय संचालकांकडे यापूर्वीही सादर केलेल्या आहेत, त्यांचा विचार व्हावा, हीच शासन दरबारी विनंती आहे.

वाचनसंस्कृतीचं जतन ही सामूहिक जबाबदारीही आहे आणि वैयक्तिक जबाबदारीही आहे. मागे एका पुस्तक प्रदर्शनात एका मुलीनं काही पुस्तकं चोरली; पण तिची ही चोरी पकडली गेली. तेव्हा मी त्या मुलीला बोलावून ती पुस्तकं सप्रेम भेट दिली. तेव्हा वर्तमानपत्रामध्ये 'चोरी केली, पण बक्षीस मिळालं,' अशा आशयाची बातमी प्रसिद्ध झाली होती. यातला कौतुकाचा भाग आपण सोडून देऊ; पण वाचनाची तहान असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचणं आपली जबाबदारी आहे. यासाठी मी माझ्यापरीने काही प्रयत्न करतो आहे. जागतिक पुस्तक दिनी काही दुर्गम भागांतील शिक्षकांना बोलावून मी शाळांसाठी पुस्तकं भेट देतो; पण ही पुस्तकं शाळेच्या ग्रंथालयात जाण्याऐवजी थेट विद्यार्थ्यांना दिली जातात. त्या पुस्तकावर त्यांना आपलं नाव आवर्जून घालू दिलं जातं. जेणेकरून त्या विद्यार्थ्याला त्या पुस्तकाबद्दल विशेष आत्मीयता वाटते. आणि नंतर शाळेतील मुलं ती पुस्तकं आपापसात वाटून घेऊन वाचतात. हा उपक्रम भलेही छोटा असेल; पण यातून काही चांगले वाचक आणि प्रकाशन व्यवसायाचे पोशिंदे घडणार आहेत, याची मला खात्री वाटते. त्यामुळे प्रकाशकांनी, विक्रेत्यांनी, शाळांनी असे उपक्रम राबवायला हवेत. यासाठी आपण सर्वांनी एकत्रित येऊन विचारमंथन करायला हवं.

शासनाकडे अपेक्षा व्यक्त करताना सर्व प्रकाशकांनी एकत्रित येऊन आणि संघाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न करायला हवेत. सध्याच्या परिस्थितीत प्रकाशन व्यवसायाच्या वाढीसाठी प्रकाशकांच्या अनेक संघटना नसाव्यात. एकच सक्षम संघटना असावी, ज्यामुळे प्रकाशकांमधील एकीने प्रकाशकांच्या

अनेक समस्या सोडवता येतील. त्यामुळे आपल्या संघाच्या कामाला अधिक प्रोत्साहन मिळेल, यासाठी प्रकाशकांनीही हातभार लावायला हवा. सरकारी योजनांच्या योग्य कार्यवाहीसाठी दबाव आणायचा असेल, तर आपण एकत्र काम करायला हवं. आपण सर्व प्रकाशक भलेही एका व्यवसायात असू, पण माझ्या मते आपण स्पर्धक नाही तर व्यावसायिक मित्र आहोत. इतर प्रकाशकांनी प्रकाशित केलेली कितीतरी पुस्तकं माझी आवडती पुस्तकं आहेत, तसेच आम्ही प्रकाशित केलेल्या पुस्तकांबाबतही मला आमच्या प्रकाशक मित्रांकडून प्रतिक्रिया येत असतात. अगदी एका विषयावरील पुस्तकं असली तरी एक पुस्तक दुसऱ्या पुस्तकाला पूरक असतं, त्यामुळंच सर्व प्रकाशक एकत्रित येऊन वाचनसंस्कृती वाढीसाठी प्रयत्न करू शकतात. अगदी दोन प्रकाशकांनी एकत्र येऊन एकत्रित प्रकाशन सोहळे, वाचनकट्ट्यासारखे उपक्रम राबवायलाही हरकत नाही. अगदी प्रकाशक एकत्रित जाहिरातीही देऊ शकतात. वितरक ज्याप्रमाणे विविध प्रकाशनांची पुस्तकं एका दालनात विकू शकतो, त्याप्रमाणे प्रकाशकांचं एकत्रित स्टोअरही उभारता येऊ शकतं. तशा एकत्र येण्यातून आपण एकत्रितरीत्या Discount Structure ठरवू शकतो; पण त्यासाठी आपल्यात एकीचं बळ असणं आवश्यक आहे. दुबईतल्या शारजा पब्लिशिंग सिटीसारखा एखादा प्रकल्प आपल्यालाही राबवता यायला हवा, असं मला वाटतं. या पब्लिशिंग सिटीमध्ये प्रकाशनाशी संबंधित प्रत्येक व्यवसाय अंतर्भूत करण्यात आला आहे आणि एका छताखाली साऱ्या सुविधा उपलब्ध आहेत. आपण त्या दृष्टीने विचार केला, तरच आपली पावले त्या दिशेने मार्गक्रमण करू शकतील.

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाने आपल्या परीने वेळोवेळी वाचनसंस्कृतीच्या वाढीसाठी प्रयत्न केले आहेत. आपलं हे संमेलनही याच प्रयत्नांचा भाग आहे. संघाने स्थापन केलेला what's app ग्रुप म्हणजे संघही नव्या माध्यमांना स्वागतशील असल्याचं द्योतक आहे. आज जागतिक संपर्कासाठी वेबसाइटचं माध्यम जास्त प्रभावशाली आहे. संघाने स्वत:ची वेबसाइट तयार केली आहे आणि ती अद्ययावत राखण्याचा त्यांचा प्रयत्नही कौतुकास्पद आहे. या वेबसाइटवर आणखी काही उपक्रम राबविल्यास ती आणखी प्रभावी होईल. महाराष्ट्रातील सर्व पुस्तक विक्रेत्यांची माहिती या वेबसाइटवर असायला हवी. संघाचं सभासदत्व वेबसाइटवरच घेता यावं, यासाठी E-COMMERCE चा वापर करणं शक्य आहे. मराठीतील सर्व

लेखकांची सूची इथे उपलब्ध असायला हवी. दरवर्षी प्रकाशित होणारी पुस्तकं आणि त्यांच्या प्रकाशकांची माहितीही वेबसाइटवर असायला हवी. या वेबसाइटवर उत्पन्न निर्मितीसाठी जाहिरातीही देता येऊ शकतात. शिवाय पुस्तक विक्रीचा पर्याय उपलब्ध केल्यास छोट्या प्रकाशकांना याचा अधिक लाभ होऊ शकतो. त्यांच्या या प्रयत्नांमुळे प्रकाशन व्यवसायाच्या वृद्धीसाठी नक्कीच हातभार लागेल, असं वाटतं; पण त्या बरोबरच नव्या उत्साही प्रकाशकांनी संघाच्या कामामध्ये आणखी उत्स्फूर्त सहभाग नोंदवायला हवा, असंही वाटतं.

जाता जाता इतकंच सांगावंसं वाटतं की आपलं हे संमेलन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनापेक्षा मोठं व्हावं. हे आवर्जून सांगायचं कारण की हे साहित्य-निर्मितीत समाविष्ट सर्व घटकांचं संमेलन आहे. फक्त लेखकांचं नाही, तर लेखकांना प्रकाशात आणणाऱ्या प्रकाशकांचं तर आहेच, पण वाचकांना समृद्ध करणाऱ्यांचंही आहे.

आज या संमेलनाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर सोपवून संघाने माझ्यावर जो विश्वास दाखवला, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. आणि आपण सर्व संमेलनाच्या यशस्वितेसाठी प्रयत्नशील आहात, पुस्तकांवरच्या प्रेमासाठी इथे आला आहात, याबद्दल आपलेही मन:पूर्वक आभार. मी इथे मांडलेल्या मुद्द्यांबाबत कुणालाही सविस्तर चर्चा करायची असल्यास आपण जरूर बोलू या.

**जय मराठी!**

**जय महाराष्ट्र!**

**१६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२० दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ जानेवारी दरम्यान खास सवलत**

**१६ जानेवारी - मिलिंद गाडगीळ यांचा जन्मदिन**

'संधिकाल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९९/-**

**१७ जानेवारी - मालविका आमडेकर यांचा जन्मदिन**

'कांगारू देशीच्या गोष्टी' (४ पुस्तकांचा संच) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

**१९ जानेवारी - अभिजित कुलकर्णी यांचा जन्मदिन**

'रेड टेप' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २४९/-**

**२१ जानेवारी - डॉ. प्रतिभा राय यांचा जन्मदिन**

'पूजाघर' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

**२१ जानेवारी - पॉल ॲलन यांचा जन्मदिन**

'आयडिया मॅन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-**

**२२ जानेवारी - आर्यन कायले यांचा जन्मदिन**

'द गॉड ऑफ ॲनिमल्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

**२३ जानेवारी - नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती**

'नेताजी', 'नेताजी सुभाषचंद्र बोस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४९०/- । सवलत किंमत ३४९/-**

**२३ जानेवारी - बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मदिवस**

'एकवचनी भाग १ आणि २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५४९/-**

**२४ जानेवारी - मिचिओ काकू यांचा जन्मदिन**

‘अशक्य भौतिकी’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन**

‘फ्रीडम ॲट मिडनाइट’, ‘मोहनदास’, ‘परमवीर चक्र:रणांगणावरील आपले महान योद्धे’, ‘भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया’, ‘महामानव सरदार पटेल’, ‘नेताजी’, ‘क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता’, ‘सैनिक हो, तुमच्यासाठी...’, ‘सत्तरीतला भारत’, ‘महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३९५०/- । सवलत किंमत २५९९/-**

---

**२६ जानेवारी - अनिता नायर यांचा जन्मदिवस**

‘लेडीज कूपे’, ‘विस्मरणातच सर्वकाही!’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६१०/- । सवलत किंमत ३९९/-**

---

**२६ जानेवारी - जोनाथन कॅरोल यांचा जन्मदिन**

‘द घोस्ट इन लव्ह’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२८ जानेवारी - मायकेल हेस्टिंग्ज यांचा जन्मदिन**

‘आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**२८ जानेवारी - डॉ. अरुणा कौलगुड यांचा जन्मदिवस**

‘‘इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझन्टेशन स्किल्स’, ‘जगप्रसिद्ध व्हा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २७५/- । सवलत किंमत १६९/-**

---

**२८ जानेवारी - डॉ. क्रेफ्लो डॉलर यांचा जन्मदिन**

‘वादळातील दीपस्तंभ’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**३० जानेवारी - पिंकी विराणी यांचा जन्मदिवस**

‘पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब’, ‘अरुणाची गोष्ट’, ‘डेफ हेवन’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८१५/- । सवलत किंमत ५४९/-**

---

## खालील संचांवर १ ते १५ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत

**१ फेब्रुवारी - सोफी लगूना यांचा जन्मदिन**

‘वन फुट राँग’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**२ फेब्रुवारी - खुशवंत सिंग यांचा जन्मदिवस**

‘माझ्या आयुष्यात आलेल्या स्त्रिया आणि पुरुष’, ‘सेक्स, स्कॉच अँड स्कॉलरशिप’, ‘द कंपनी ऑफ विमेन’, ‘मृत्यू ... माझ्या उंबरठ्याशी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८७५/- । सवलत किंमत ५९९/-**

---

**३ फेब्रुवारी - दीप्ती नवल यांचा जन्मदिन**

‘द मॅड तिबेटियन : गोष्टी तेव्हाच्या आणि आत्ताच्या!’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**४ फेब्रुवारी - डॉ. गौरी बोरकर यांचा जन्मदिवस**

‘गर्भसंस्कार’, ‘स्थूलतेला करा टाटा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

---

**४ फेब्रुवारी - फेसबुक डे**

‘द फेसबुक इफेक्ट’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

---

**५ फेब्रुवारी - गिरिजा कीर यांचा जन्मदिवस**

‘आकाशवेध’, ‘जन्मठेप’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १४९/-**

---

**८ फेब्रुवारी - जॉन ग्रिशॅम यांचा जन्मदिवस**

‘अ टाइम टु किल’, ‘द असोशिएट’, ‘द चेम्बर’, ‘द क्लायंट’, ‘द फर्म’, ‘द पेलिकन ब्रीफ’, ‘द रेनमेकर’, ‘द पाटर्नर’, ‘द रनअवे ज्यूरी’, ‘द लास्ट ज्यूरर’, ‘द टेस्टामेंट’, ‘द स्ट्रीट लॉयर’, ‘द ब्रोकर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५३९०/- । सवलत किंमत २७४९/-**

**१० फेब्रुवारी - राधिका टिपरे यांचा जन्मदिन**

'वेरूळ लेण्यांतील शिल्पवैभव' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

---

**११ फेब्रुवारी - स्टिफन सी. लन्डिन यांचा जन्मदिवस**

'फिश!', 'फिश! फॉर लाइफ', 'फिश! स्टीक्स', 'फिश! टेल्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४४९/-**

---

**१२ फेब्रुवारी - दयानंद सरस्वती यांचा जन्मदिन**

'महर्षी दयानंद सरस्वती' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ९५/- । सवलत किंमत ५९/-**

---

**१२ फेब्रुवारी - वैदेही यांचा जन्मदिन**

'अशीच काही पानं...' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १३०/- । सवलत किंमत ८९/-**

---

**१२ फेब्रुवारी - राजेंद्र आकलेकर यांचा जन्मदिन**

'कहाणी पहिल्या आगीनगाडीची' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

---

**१३ फेब्रुवारी - कोडी मॅकफॅदियेन यांचा जन्मदिन**

'शॅडो मॅन', 'द डार्कर साइड', 'द फेस ऑफ डेथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १४८०/- । सवलत किंमत ९९९/-**

---

**१४ फेब्रुवारी - व्हॅलेंटाइन डे**

**संच १**-'चिकन सूप फॉर द कपल्स सोल' 'दॅट थिंग कॉल्ड लव्ह', 'एक अनादि अनंत प्रेमकहाणी', 'प्रेमाची परिभाषा', 'अनादि-अनंत', 'अद्वैत', 'आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद', 'चिकन सूप फॉर द सोल टु लव्ह भाग –१ आणि भाग २' 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग', 'प्रेमकथा', 'द प्राइस ऑफ लव्ह', 'अन्कंडिशनल लव्ह', 'देवदास' या पुस्तकावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३६२०/- । सवलत किंमत २४४९/-**

**संच २ –**'फिफ्टी शेड्स डार्कर', 'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३९९/-**

---





**शर्मिला फडके लिखित 'फोर सीझन्स' कादंबरीला सोलापूर येथील लोकमंगल वाचनालयामार्फत** दिला जाणारा **सर्वोत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार लाभला.**




**ज्येष्ठ अनुवादक आणि लेखिका उमा कुलकर्णी** यांना त्यांच्या **साहित्यिक कारकिर्दीसाठी मनोरमा साहित्य पुरस्काराने गौरवण्यात आले.**


**Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020**
**RNI. No. MAHMAR/2000/02739**
**No. CSO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/01/2020 Posting Date : 11/01/2020


## नवीन संहिता... नवा आशय...













**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,